प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, समाधानकारक माहिती न मिळाल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात प्रतिसाद देऊन माहिती अभिलेखात नसल्याचे अपिलार्थी यांना कळविले असल्याचे दिसुन येत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहिती / वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 3371 दिनांक : 11/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ९०२ व ३७४५/२०२५ (०२)

श्री.सुधिर ज.साबळे,
रा.एन-११, ए-११६, डी-१७/१, सिडको, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता,
जागतिक बँक प्रकल्प उपविभाग क्र.०४, बांधकाम भवन, स्नेहनगर, अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
जागतिक बँक प्रकल्प उपविभाग क्र.०४, बांधकाम भवन, स्नेहनगर, अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०३.०३.२०२५ व दि.०८.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, श्री.के.पी.गायकवाड उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ०४ | १३.१२.२०२४ | विश्वासनगर (लेबर कॉलनी) औरंगाबाद येथील जागा व प्रकल्प संबंधी माहिती दि.०५.१२.२०२४ ते आजपर्यंत, विश्वासनगर (लेबर कॉलनी) औरंगाबादच्या जागा व कॉलनी या संदर्भातील पूर्ण संचिकास निरीक्षणास उपलब्ध करुन मिळावी व जी माहिती चिन्हांकित होईल ती माहिती यादी, |
| ०५ | २३.०५.२०२५ | विश्वासनगर (लेबर कॉलनी) छत्रपती संभाजीनगर येथील जागेवर असलेल्या झाडे व वृक्षसंबंधी माहिती मिळणेबाबत, सन २०२२ ते आजपर्यंत, विश्वासनगर (लेबर कॉलनी) छत्रपती संभाजीनगर येथील जागेवर प्रशासकीय इमारत आपल्या विभागातर्फे बांधण्यात येत आहे, सदर काम होत असलेल्या जागेवर मोठ्या प्रमाणात झाडे व वृक्ष होते, बांधकाम कामी काही झाडे तोडण्याची परवानगी आपल्या विभागामार्फत केली आहे, तेव्हा या जागेवर मागणी करतेवेळी किती वृक्ष होते व त्यातील किती वृक्ष तोडण्याची मागणी केली आहे, आणि आज सध्या किती वृक्ष उपलब्ध आहे, याची सविस्तर माहिती देण्यात (संपूर्ण संचिका) यावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दोनही माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती यापूर्वी अपिलार्थीस टपालाव्दारे पुरविण्यात आलेली आहे. सदर मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असुन सदर माहिती पुन:श्च एकत्रित / संकलित करुन अपिलार्थीस आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता सोबत आणलेली आहे. सदर माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही अनुसरण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, प्रथम अपिलाची सुनावणी झाली नाही आणि दि.१०.०२.२०२५ रोजी अर्ज निकाली काढला, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार सदर माहिती अपिलार्थी यांना देण्यात आली. अपिलार्थी यांनी सदर माहिती आयोगासमक्ष स्विकारलेली आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3295 दिनांक : 6/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४५१४/२०२५
बोर्ड क्र.०६

श्री.सुधीर जनार्धन साबळे,
रा.एन-११, ए-११६, डी-१७/०१, सिडको, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
विशेष अधीक्षक,
सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, बांधकाम भवन, स्नेहनगर,
अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक मुख्य अभियंता (रस्ते),
सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, बांधकाम भवन, स्नेहनगर,
अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

## (सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०३.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा विशेष अधीक्षक, श्री.एस.यु.ब्रम्हराक्षस उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०३.०६.२०२५ | अर्जदार यांनी दिलेले निवेदनेबाबत झालेली अथवा होत असलेले कार्यवाहीची संपूर्ण माहिती, अर्जदार यांनी दिलेले निवेदने दि.१८.०५.२०२२ (विषय - विश्वासनगर औरंगाबाद येथील सदरील कॉलनी बेकायदेशीर पध्दतीने जमीनदोस्त करुन मूळ रहिवाशीयावर अन्याय व अत्याचार करणाऱ्या या कार्यवाहीची विशेष समितीचे स्थापना करुन चौकशी करणेबाबत), दि.१६.०१.२०२५ (विषय - विश्वासनगर लेबर कॉलनीची बांधकामसाठी दिलेली प्रशासकीय मान्यता रद्द करणेबाबत), दि.२१.०३.२०२५ सदर निवेदन जे तत्कालीन मुख्यमंत्री कार्यालय, महसूल विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या नावे सादर केलेली आहे जी दि.०२.०१.२०२५ च्या सा.बा. विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या पत्रासह पुढील कार्यवाहीस्तव आपल्याकडे वर्ग केलेली आहे, याबाबत झालेली अथवा होत असलेले कार्यवाहीची संपूर्ण माहिती देण्यात यावी, |

- आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जात नमूद माहितीच्या अनुषंगाने शासनाचे पत्र व पत्रासोबतची अपिलार्थी यांची तक्रार याबाबत अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांना प्रकरण तपासुन वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याचे कळविण्यात आलेले आहे. सदर पत्राची प्रत अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.१३.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन अपिलार्थी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२९.०७.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मुदतीत पत्रव्यवहार केला असल्याचा निष्कर्ष काढुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न देता केवळ पत्रव्यवहार केल्याबद्दल आदेश दिला म्हणून पारित झालेले आदेश समाधानकारक नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात प्रतिसाद देऊन माहिती / वस्तुस्थिती अपिलार्थीस अवगत केली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 3382 दिनांक : 11/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

व्दितीय अपील क्रमांक ४४९६ ते ४५००/२०२५ (०५)

श्री.मीर मुजफ्फर अली,
रा.के.के.ग्रुपच्या शेजारी, गुलशन मस्जिद पाठीमागे, जिल्हाधिकारी कार्यालय कंपाऊंड, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता,
जागतिक बँक प्रकल्प उपविभाग क्र.०४, बांधकाम भवन, स्नेहनगर, अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
जागतिक बँक प्रकल्प उपविभाग क्र.०४, बांधकाम भवन, स्नेहनगर, अदालत रोड, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०१.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये पाच व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, श्री.के.पी.गायकवाड उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या पाच जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ०७ | ०५.०३.२०२५ | लेबर कॉलनी (विश्वासनगर) छत्रपती संभाजीनगर -औरंगाबाद जुना सर्व्हे क्र.७, १०, ११, १३, ३१, २१५ एकूण क्षेत्रफळ २२ एकर २५ गुंठे येथील जमिनीवर शासनाकडुन भूसंपादन करण्यासाठी प्रस्ताव, भूसंपादनाचा मोबदला, खरेदीखत, औरंगाबाद येथे नवीन मध्यवर्ती प्रशासकीय इमारत बांधकाम बाबत कागदपत्रांची छायांकित सत्यप्रत मिळणेबाबत ०२ मुद्यांवर माहिती, सन १९५० ते आजपर्यंत, |
| ०८ | ०५.०३.२०२५ | लेबर कॉलनी (विश्वासनगर) छत्रपती संभाजीनगर -औरंगाबाद जुना सर्व्हे क्र.७, १०, ११, १३, ३१, २१५ एकूण क्षेत्रफळ २२ एकर २५ गुंठे येथील जमिनीवर शासनाकडुन भूसंपादन करण्यासाठी प्रस्ताव, भूसंपादनाचा मोबदला, खरेदीखत, औरंगाबाद येथे नवीन मध्यवर्ती प्रशासकीय इमारत बांधकाम बाबत कागदपत्रांची छायांकित सत्यप्रत मिळणेबाबत १२ मुद्यांवर माहिती, सन १९५० ते आजपर्यंत, |
| ०९ | ०५.०३.२०२५ | लेबर कॉलनी (विश्वासनगर) छत्रपती संभाजीनगर -औरंगाबाद जुना सर्व्हे क्र.७, १०, ११, १३, ३१, २१५ एकूण क्षेत्रफळ २२ एकर २५ गुंठे येथील जमिनीवर शासनाकडुन |

| | | |
|---|---|---|
| | | भूसंपादन करण्यासाठी प्रस्ताव, भूसंपादनाचा मोबदला, खरेदीखत, औरंगाबाद येथे नवीन मध्यवर्ती प्रशासकीय इमारत बांधकाम बाबत कागदपत्रांची छायांकित सत्यप्रत मिळणेबाबत १२ मुद्यांवर माहिती, सन १९५० ते आजपर्यंत, |
| १० | ०५.०३.२०२५ | लेबर कॉलनी (विश्वासनगर) छत्रपती संभाजीनगर -औरंगाबाद जुना सर्व्हे क्र.७, १०, ११, १३, ३१, २१५ एकूण क्षेत्रफळ २२ एकर २५ गुंठे येथील जमिनीवर शासनाकडुन भूसंपादन करण्यासाठी प्रस्ताव, भूसंपादनाचा मोबदला, खरेदीखत, औरंगाबाद येथे नवीन मध्यवर्ती प्रशासकीय इमारत बांधकाम बाबत कागदपत्रांची छायांकित सत्यप्रत मिळणेबाबत १० मुद्यांवर माहिती, सन १९५० ते आजपर्यंत, |
| ११ | ०५.०३.२०२५ | लेबर कॉलनी (विश्वासनगर) छत्रपती संभाजीनगर -औरंगाबाद जुना सर्व्हे क्र.७, १०, ११, १३, ३१, २१५ एकूण क्षेत्रफळ २२ एकर २५ गुंठे येथील जमिनीवर शासनाकडुन भूसंपादन करण्यासाठी प्रस्ताव, भूसंपादनाचा मोबदला, खरेदीखत, औरंगाबाद येथे नवीन मध्यवर्ती प्रशासकीय इमारत बांधकाम बाबत कागदपत्रांची छायांकित सत्यप्रत मिळणेबाबत १२ मुद्यांवर माहिती, सन १९५० ते आजपर्यंत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या पाचही माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती यापूर्वी अपिलार्थीस टपालाव्दारे पुरविण्यात आलेली आहे. सदर मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असुन सदर माहिती पुन:श्च एकत्रित / संकलित करुन अपिलार्थीस आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता आज रोजी सोबत देखील आणलेली आहे. सदर माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही अनुसरण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता जन माहिती अधिकारी यांनी सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार सदर माहिती अपिलार्थी यांना देण्यात आली. अपिलार्थी यांनी सदर माहिती आयोगासमक्ष स्विकारलेली आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त पाच व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3293 दिनांक : 6/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १८४ ते १८९, ८४८, १२८८ ते १२९०, १२९३ ते १२९७, १६०६ ते १६०८ व ४१०६ ते ४१०८/२०२५ (२१)

श्री.भास्कर भुजंगराव खेडकर, अपिलार्थी
रा.युनिक वास्तु, फ्लॅट क्र.०३, सिरीन मेडोज वासन बंगल्याजवळ,
नाशिक

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
प्रशासकीय अधिकारी,
वाल्मी, कांचनवाडी, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
सहसंचालक,
वाल्मी, कांचनवाडी, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१३.०१.२०२५ (०६), दि.२४.०२.२०२५ (०१), दि.२६.०३.२०२५ (०८), दि.२३.०४.२०२४ (०३) व दि.०९.०९.२०२५ (०३) रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये २१ द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या २१ जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| १२ | १२.०८.२०२४ | सन २०२३-२४ या वर्षात विद्युतीकरणाच्या प्रशासकीय मान्यता, टेंडर नोटीस, वर्क ऑर्डर इ. |
| १३ | १२.०८.२०२४ | विद्युतीकरण, विद्युतीकरण देखभाल व दुरुस्ती व एनर्जी बिलावर झालेला खर्च, सन २०२२-२३ व २०२३-२४, |
| १४ | १२.०८.२०२४ | सहाव्या वेतन आयोगाअंतर्गतच्या सु.से.आश्वासित प्रगती योजनाबाबत, दि.०१.०४.२०१० पासुन आजपर्यंत, |
| १५ | १२.०८.२०२४ | सेवेतील अतिउत्कृष्ठ कामामुळे देण्यात येणाऱ्या आगाऊ वेतन वाढीची, अनावधानाने राहुन गेलेली कार्यवाही करणेबाबत, दि.१५.१२.२०२२ शासन निर्णयानंतर, |

| | | |
|---|---|---|
| १६ | १२.०८.२०२४ | विनंती अर्जावर झालेली कार्यवाही (रोजनामा) व सद्यस्थिती, दि.३१ मार्च २०२३ ते दि.३१.०७.२०२४ एकूण आठ विनंती अर्ज, |
| १७ | १२.०८.२०२४ | विनंती अर्जावर झालेली कार्यवाही, घेतलेला तपशिलवार निर्णय व सद्यस्थिती, दि.३१.०३.२०२३ ते दि.३१.०७.२०२४ एकूण आठ विनंती अर्ज, |
| १८ | १८.०९.२०२४ | मृद व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई यांच्या पत्र क्र.वाल्मी २०२४/प्रक्र.५१ / जल-९, दि.०८.०८.२०२४ नुसार संस्थेने सादर केलेल्या खुलाशाच्या पत्राची माहिती, |
| १९ | २१.११.२०२४ | शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची नेमणूक करणारे प्राधिकारी, पदनाम, कार्यालयीन टेलिफोन व इ-मेल पत्ता मिळावा, |
| २० | २१.११.२०२४ | विद्युतीकरणाची कामे Technical Specifications प्रमाणे झाल्याची सक्षम प्राधिकाऱ्याची प्रमाणपत्र दि.०१.०४.२०२२ ते दि.३१.०३.२०२४, |
| २१ | २१.११.२०२४ | सन २०२३-२४ व सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे वेतनाचे व वेतनेत्तर विकास कामाचे अर्थसंकल्प सन २०२३-२४ व २०२४-२५, |
| २२ | ०९.०९.२०२४ | वाल्मी परिसरातील निवासस्थानाबाबत, |
| २३ | ०९.०९.२०२४ | दि.१४.११.२०१९ रोजीच्या शासनाच्या पत्रातील सुचनेनुसार संस्थेने केलेली कार्यवाही दि.१४.११.२०१९ नंतर, |
| २४ | ०९.०९.२०२४ | वाल्मी नियामक मंडळाला कर्मचाऱ्याच्या भत्त्यात सुधारणा करण्यासाठीच्या अधिकाराबाबत सन २०२३-२४, |
| २५ | ०९.०४.२०२४ | संस्थेतील विद्युत विषयक कामाची अंदाजपत्रके, supervision व देयके करण्याची कामे स्थापत्य अभियंत्याकडुन करण्यासाठीची शासन मान्यता, सन २०२३-२४, |
| २६ | ०९.०९.२०२४ | माहितीच्या अधिकारासाठीच्या अर्ज निकाली काढण्यासाठीचा अधिकार जन माहिती अधिकारी यांना बहाल करण्यात आलेले कलम, |
| २७ | १३.०१.२०२५ | निरुपयोगी (भंगार) सामूग्रीच्या ई-निविदा जाहीर लिलाव सुचनेबाबत, सन २०२३-२४ |
| २८ | १३.०१.२०२५ | शासनाने वितरित केलेल्या निधीच्या पत्राच्या सत्यप्रती, सन एप्रिल २०२३ ते ३१ डिसेंबर २०२४, |
| २९ | १३.०१.२०२५ | उपयोगिता प्रमाणपत्रा सत्यप्रती मिळणेबाबत, सन २०२२-२३ व सन २०२३-२४, |
| ३० | २३.०४.२०२५ | आक्टोबर २००६ पासुन अतिउत्कृष्ट कामगिरीमुळे द्यावयाच्या आगाऊ वार्षिक वेतनवाढीच्या समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत, सन २००६-२००७, |
| ३१ | २३.०४.२०२५ | विद्युतीकरणाच्या प्राकलनासाठीच्या आधारभुत PWD Norms (मापदंड) बाबत, सन २०२३-२४ व २०२४-२५, |
| ३२ | २३.०४.२०२५ | भांडार विभागामार्फत P.A.C. च्या मंजुरीने खरेदी करण्यात आलेल्या सामग्रीबाबत, सन २०२३-२४ व सन २०२४-२५, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध आयोगापुढील कागदपत्रावरुन होत नाही. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप विचारात घेता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम २ (J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, वाल्मी, कांचनवाडी, पैठण रोड, छत्रपती

संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद सर्व जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली प्रति माहिती अर्ज ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना प्रति माहिती अर्ज ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, वाल्मी, कांचनवाडी, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत कार्यवाही केलेली नसून माहितीचा अर्ज योग्य पध्दतीने हाताळलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.०७.०४.२०२६ रोजी वेळ दुपारी ०२.०० वा. आयोगासमोर व्यक्तिशः** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. संचालक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, वाल्मी, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या **दि.३०.०९.२०२४ (६), दि.०६.११.२०२४ (१), दि.१३.०१.२०२५ (३), दि.१७.१०.२०२४ (५), दि.२४.०२.२०२५ (३), दि.०९.०६.२०२५ (३)** रोजीच्या एकूण **२१** प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. संचालक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, वाल्मी, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. उपरोक्त निर्देशासह २१ व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 2965 दिनांक : 25/2/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,

संचालक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, वाल्मी, कांचनवाडी, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ३४९/२०२५
बोर्ड क्र.३३

श्री.प्रशांत बाहुबली शहा,
रा.प्लॉट नंबर २६५, इंडियन बँकेसमोर, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
प्रशासकीय अधिकारी,
वाल्मी, कांचनवाडी, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहसंचालक,
वाल्मी, कांचनवाडी, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२३.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०४.११.२०२४ | अग्नीशमन उपकरणांवर झालेला खर्च त्यासाठी अवलंबलेली प्रक्रियेचे कागदपत्रे व पारित केलेले देयकाची प्रत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीची नितांत आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती व प्रथम अपील अर्जाची गांभिर्याने दखल घेतली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमातील तरतुदीनुसार यथोचित कारवाई प्रस्तावित करण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यात आली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप विचारात घेता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम २ (J) मधील

तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, वाल्मी, कांचनवाडी, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली प्रति माहिती अर्ज ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना प्रति माहिती अर्ज ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, वाल्मी, कांचनवाडी, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत कार्यवाही केलेली नसून माहितीचा अर्ज योग्य पध्दतीने हाताळलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.०७.०४.२०२६ रोजी वेळ दुपारी ०२.०० वा. आयोगासमोर** व्यक्तिशः उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. संचालक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, वाल्मी, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या **दि.०९.१२.२०२४** रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. संचालक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, वाल्मी, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 3161 दिनांक : 6/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,

संचालक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, वाल्मी, कांचनवाडी, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ३५०/२०२५
बोर्ड क्र.३४

श्री.प्रशांत बाहुबली शहा, — अपिलार्थी
रा.प्लॉट नंबर २६५, इंडियन बँकेसमोर, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उपकार्यकारी अभियंता,
लघु पाटबंधारे विभाग क्र.१, सिंचन भवन, जालना रोड,
छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
लघु पाटबंधारे विभाग क्र.१, सिंचन भवन, जालना रोड,
छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२३.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०५.११.२०२४ | भांडार विभागाकडुन वस्तु घेण्यासाठी पुरवठादाराना दिलेल्या आदेशाची / देयकांची प्रत व त्यासाठी अवलंबलेल्या प्रक्रियेची कागदपत्रे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीची नितांत आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती व प्रथम अपील अर्जाची गांभिर्याने दखल घेतली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमातील तरतुदीनुसार यथोचित कारवाई प्रस्तावित करण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यात आली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या

मुदतीत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप विचारात घेता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम २ (J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्र.०१, सिंचन भवन, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्र.०१, सिंचन भवन, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत कार्यवाही केलेली नसून माहितीचा अर्ज योग्य पध्दतीने हाताळलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह दि.०७.०४.२०२६ रोजी वेळ दुपारी ०२.०० वा. आयोगासमोर व्यक्तिशः उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.०९.१२.२०२४ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे मंडळ, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.-3162- दिनांक :-6/3/2026-नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे मंडळ, छत्रपती संभाजीनगर

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५९६३ ते ५९६८/२०२५ (०६)

श्री.मनिष भगवानदास अग्रवाल,
रा.प्लॉट नंबर ए-५१, नाथनगर, सिंधी कॉलनी मागे,
छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
प्रशासकीय अधिकारी,
वाल्मी, कांचनवाडी, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता तथा सहसंचालक,
वाल्मी, कांचनवाडी, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२४.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये सहा द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या सहा जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ३५ | ११.०९.२०२५ | दि.१४.०१.२०२३ ते दि.११.०९.२०२५, मासिक खरेदीची माहिती, आपल्या कार्यालयात आवश्यक असलेल्या लेखन, साधन, सामग्रीच्या खरेदीसाठी खरेदी सल्लागार समिती, वाल्मी, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे सादर केलेला मासिक खरेदी मान्यतेची व देयकांची छायांकित प्रती कार्यालयीन पत्रासह कार्यालयाच्या शिक्क्यासह माहिती, |
| ३६ | ११.०९.२०२५ | दि.१४.०१.२०२३ ते दि.११.०९.२०२५, मासिक अहवालाची माहिती मिळणेबाबत, आपल्या कार्यालयात आवश्यक असलेल्या लेखन, साधन, सामग्रीचा अध्यक्ष तथा सहसंचालक खरेदी सल्लागार समिती, वाल्मी, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे सादर केलेला मासिक खरेदी तपशिलांची छायांकित प्रती कार्यालयीन पत्रासह कार्यालयाच्या शिक्क्यासह माहिती, |
| ३७ | १९.०८.२०२५ | दि.१४.०१.२०२५ ते दि.२२.०८.२०२५, कार्यारंभ आदेशाची माहिती मिळणेबाबत, आपल्या कार्यालयाने दि.१४.०१.२०२५ पूर्वी क्षेत्रिय कामाचे दिलेल्या कार्यारंभ आदेशापैकी रद्द केलेले कार्यारंभ आदेशाची व कार्यारंभ आदेश एजन्सीला निधी अभावी कामाला दिलेली स्थगिती किंवा काम करु नये याबाबत दिलेले आदेशाची छायांकित प्रती कार्यालयीन पत्रासह कार्यालयाच्या शिक्क्यासह माहिती, |

| | | |
|---|---|---|
| ३८ | २१.०८.२०२५ | दि.१४.०१.२०२३ ते दि.२२.०८.२०२५, कंत्राटी कर्मचाऱ्यांची माहिती मिळणेबाबत, आपल्या कार्यालयाने दि.१४.०१.२०२३ पासुन सेवा निवृत्त तांत्रिक, अतांत्रिक कर्मचारी, अधिकारी यांना मानधनावर कंत्राटीपध्दतीने वेळोवेळी दिलेली नियुक्ती आदेशाची, मुदतवाढ, आदेशाची व मानधनावर आजपर्यंत दिलेल्या वेतनाची छायांकित प्रती |
| ३९ | २१.०८.२०२५ | दि.१४.०१.२०२३ ते दि.२२.०८.२०२५, शासकीय वाहनाची माहिती मिळणेबाबत, आपल्या कार्यालयात असलेले शासकीय वाहन टाटा सुमो एमएच २० एवाय ३३८९ वाहन वापरत असलेल्या अधिकाऱ्याचे नाव, सदर वाहन वापरताना नोंद केलेले शासकीय वाहनाचे लॉगबुक, सदर वाहनाचे हिस्ट्री बुकची आणि सदर वाहनाच्या इंधनाच्या व देखभाल दुरुस्तीच्या मंजूर देयकाची प्रतीपुर्ती देयकाची छायांकित प्रती, |
| ४० | ११.०९.२०२५ | दि.१४.०१.२०२३ ते दि.११.०९.२०२५, शासकीय वाहनाची माहिती मिळणेबाबत, आपल्या कार्यालयात असलेले सर्व शासकीय वाहन वापरत असलेल्या अधिकाऱ्याचे नाव, सदर वाहन वापरलेल्या नोंद केलेले शासकीय वाहनाचे लॉगबुक, सदर वाहनाचे हिस्ट्री बुकची आणि सदर वाहनाच्या इंधनाच्या व देखभाल दुरुस्तीच्या मंजूर देयकाची प्रतीपुर्ती देयकाची छायांकित प्रती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहिती नितांत आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती व प्रथम अपील अर्जाची गांभिर्याने दखल घेतली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमातील तरतुदीनुसार यथोचित कारवाई प्रस्तावित करण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, सुनावणी घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप विचारात घेता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम २ (J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक टरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, वाल्मी, कांचनवाडी, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद सर्व जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली प्रति माहिती अर्ज ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना प्रति माहिती अर्ज ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, वाल्मी, कांचनवाडी, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत कार्यवाही केलेली नसून माहितीचा अर्ज योग्य पध्दतीने हाताळलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.०७.०४.२०२६ रोजी वेळ दुपारी ०२.०० वा. आयोगासमोर व्यक्तिशः** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न

केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. संचालक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, वाल्मी, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.१४.१०.२०२५ (०३) व दि.०७.१०.२०२५ (०३) रोजीच्या एकूण सहा प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. संचालक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, वाल्मी, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. उपरोक्त निर्देशासह ०६ व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.3174 दिनांक :- 6/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
संचालक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, वाल्मी, कांचनवाडी, पैठण रोड, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५०३८ ते ५०४९/२०२५ (१२)

श्री.रणजित एच.मनोरे,
रा.रेल्वेस्टेशन, जहागिरदार कॉलनी, मुजीब सर्व्हीस सेंटरच्या बाजुला, छत्रपत संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ १.१ जन माहिती अधिकारी तथा (बोर्ड क्र.४१) : उत्तरवादी क्र.१
उपविभागीय जलसंधारण अधिकारी,
मृद व जलसंधारण उपविभाग, गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर,

१.२ जन माहिती अधिकारी तथा (बोर्ड क्र.४२) : उत्तरवादी क्र.१
उपविभागीय जलसंधारण अधिकारी,
मृद व जलसंधारण उपविभाग, सोयगाव, जि.छत्रपती संभाजीनगर,

१.३ जन माहिती अधिकारी तथा (बोर्ड क्र.४३) : उत्तरवादी क्र.१
उपविभागीय जलसंधारण अधिकारी,
मृद व जलसंधारण उपविभाग, कन्नड, जि.छत्रपती संभाजीनगर

१.४ जन माहिती अधिकारी तथा (बोर्ड क्र.४४ ते ४८) : उत्तरवादी क्र.१
सहायक जिल्हा जलसंधारण अधिकारी,
जिल्हा जलसंधारण अधिकारी यांचे कार्यालय, मृद व जलसंधारण विभाग, छत्रपती संभाजीनगर

१.५ जन माहिती अधिकारी तथा (बोर्ड क्र.४९) : उत्तरवादी क्र.१
उपविभागीय जलसंधारण अधिकारी,
मृद व जलसंधारण उपविभाग, पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर

१.६ जन माहिती अधिकारी तथा (बोर्ड क्र.५०) : उत्तरवादी क्र.१
उपविभागीय जलसंधारण अधिकारी,
मृद व जलसंधारण उपविभाग, वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर

१.७ जन माहिती अधिकारी तथा (बोर्ड क्र.५१) : उत्तरवादी क्र.१
उपविभागीय जलसंधारण अधिकारी,
मृद व जलसंधारण उपविभाग, छत्रपती संभाजीनगर

१.८ जन माहिती अधिकारी तथा (बोर्ड क्र.५२) : उत्तरवादी क्र.१
उपविभागीय जलसंधारण अधिकारी,
मृद व जलसंधारण उपविभाग, सिल्लोड, जि.छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
जिल्हा जलसंधारण अधिकारी,
मृद व जलसंधारण विभाग, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०६.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये १२ द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय जलसंधारण अधिकारी, गंगापूर व छत्रपती संभाजीनगर, श्रीमती.एस.एस.आरदवाड / उपविभागीय जलसंधारण अधिकारी, सोयगाव, श्री.सुर्यकांत देविदास निकम / उपविभागीय जलसंधारण अधिकारी, श्री.य.स.काढावळे / सहायक जिल्हा जलसंधारण अधिकारी, श्री.एस.बी.शेख / उपविभागीय जलसंधारण अधिकारी, पैठण, श्री.एस.एम.राठोड / जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय जलसंधारण अधिकारी, वैजापूर व सिल्लोड यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या १२ जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ४१ | १६.०५.२०२५ | एप्रिल २०२३ ते आजपर्यंत, गंगापूर तालुक्यातील माहे एप्रिल २०२३ व एप्रिल २०२५ पर्यंत सुरु असलेल्या पूर्ण झालेल्या कामाचे प्र.मा. आदेश कार्यारंभ आदेश, निविदा सुचना, तांत्रिक शाखा आदेश, कामाचे फोटो, टेस्ट रिपोर्ट, बिलाची कॉपी मिळणेबाबत, |
| ४२ | १६.०५.२०२५ | एप्रिल २०२३ ते आजपर्यंत, सोयगाव तालुक्यातील माहे एप्रिल २०२३ व एप्रिल २०२५ पर्यंत सुरु असलेल्या पूर्ण झालेल्या कामाचे प्र.मा. आदेश कार्यारंभ आदेश, निविदा सुचना, तांत्रिक शाखा आदेश, कामाचे फोटो, टेस्ट रिपोर्ट, बिलाची कॉपी मिळणेबाबत, |
| ४३ | १६.०५.२०२५ | एप्रिल २०२३ ते आजपर्यंत, कन्नड तालुक्यातील माहे एप्रिल २०२३ व एप्रिल २०२५ पर्यंत सुरु असलेल्या पूर्ण झालेल्या कामाचे प्र.मा. आदेश कार्यारंभ आदेश, निविदा सुचना, तांत्रिक शाखा आदेश, कामाचे फोटो, टेस्ट रिपोर्ट, बिलाची कॉपी मिळणेबाबत, |
| ४४ | १६.०५.२०२५ | ०१ जानेवारी २०२३ ते आजपर्यंत आपल्या कार्यालयाकडुन देण्यात आलेल्या कार्यारंभ आदेशाच्या सत्यप्रती देण्यात याव्यात, |
| ४५ | १६.०५.२०२५ | ०१ जानेवारी २०२३ ते आजपर्यंत या कालावधीत काढण्यात आलेल्या सर्व कामाच्या अदा करण्यात आलेल्या रक्कमेच्या बीडीएस (आरटीजीएस, एनईएफटी) च्या प्रमाणित सत्यप्रती देण्यात याव्यात, |
| ४६ | १६.०५.२०२५ | जानेवारी २०२४ ते आजपर्यंत, श्रध्दा कन्स्ट्रक्शन, राजुरेश्वर एनफ्रास्ट्रक्चर, सारा कंट्रक्शन यांना वरील कालावधीत आपल्या कार्यालयाकडुन देण्यात आलेल्या कार्यारंभ आदेशाच्या सत्यप्रती व त्यांना देण्यात आलेल्या बिलाच्या व सीसीच्या सत्यप्रती देण्यात याव्यात, |
| ४७ | १६.०५.२०२५ | ०१ जानेवारी २०२३ ते आजपर्यंत, वरील कालावधीत आपल्या कार्यालयातंर्गत वितरित झालेल्या कामाच्या बी-१ निविदांच्या रजिस्टरच्या सत्यप्रती देण्यात याव्यात, |
| ४८ | १६.०५.२०२५ | ०१ जानेवारी २०२३ ते आजपर्यंत, वरील कालावधीतील आपल्या कार्यालयातील धनादेश नोंदवहीच्या (Cheque memo on Drawn) च्या सत्यप्रती देण्यात याव्यात, |
| ४९ | १६.०५.२०२५ | एप्रिल २०२३ ते आजपर्यंत, पैठण तालुक्यातील माहे एप्रिल २०२३ व एप्रिल २०२५ पर्यंत सुरु असलेल्या पूर्ण झालेल्या कामाचे प्र.मा. आदेश कार्यारंभ आदेश, निविदा सुचना, तांत्रिक शाखा आदेश, कामाचे फोटो, टेस्ट रिपोर्ट, बिलाची कॉपी मिळणेबाबत, |

| | | |
|---|---|---|
| ५० | १६.०५.२०२५ | एप्रिल २०२३ ते आजपर्यंत, वैजापूर तालुक्यातील माहे एप्रिल २०२३ व एप्रिल २०२५ पर्यंत सुरु असलेल्या पूर्ण झालेल्या कामाचे प्र.मा. आदेश कार्यारंभ आदेश, निविदा सुचना, तांत्रिक शाखा आदेश, कामाचे फोटो, टेस्ट रिपोर्ट, बिलाची कॉपी मिळणेबाबत, |
| ५१ | १६.०५.२०२५ | एप्रिल २०२३ ते आजपर्यंत, छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील माहे एप्रिल २०२३ व एप्रिल २०२५ पर्यंत सुरु असलेल्या पूर्ण झालेल्या कामाचे प्र.मा. आदेश कार्यारंभ आदेश, निविदा सुचना, तांत्रिक शाखा आदेश, कामाचे फोटो, टेस्ट रिपोर्ट, बिलाची कॉपी मिळणेबाबत, |
| ५२ | १६.०५.२०२५ | एप्रिल २०२३ ते आजपर्यंत, सिल्लोड तालुक्यातील माहे एप्रिल २०२३ व एप्रिल २०२५ पर्यंत सुरु असलेल्या पूर्ण झालेल्या कामाचे प्र.मा. आदेश कार्यारंभ आदेश, निविदा सुचना, तांत्रिक शाखा आदेश, कामाचे फोटो, टेस्ट रिपोर्ट, बिलाची कॉपी मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान उपस्थित जन माहिती अधिकारी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, या प्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जात व्यक्तिश: माहिती हवी असल्याचे नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली बहुतांश माहिती ही विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे उपलब्ध अभिलेखाचे अवलोकन करुन आवश्यक माहिती प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीस सुचित करण्यात आलेले आहे. तसेच जी माहिती सहज उपलब्ध करुन देता येणे शक्य आहे त्यासाठी विहित शुल्काचा भरणा करणेबाबत अपिलार्थीस कळविलेले आहे. अपिलार्थी यांना सूचित केल्याप्रमाणे त्यांनी अवलोकन करण्याची व शुल्क अदा करण्याची कार्यवाही केल्यानंतर त्यांना हवी असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती प्रदान करण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती प्राप्त करुन घेऊन माहिती मिळाली अशी पोच देखील दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अद्याप माहिती प्राप्त नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. अशा स्वरुपातील माहिती एकत्रित करण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे अशा स्वरुपातील माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाहीत. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ठ सफल होत नाहीत. तसेच या प्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये त्यांना व्यक्तिश: माहिती हवी असल्याचे नमूद केलेले आहे. तथापि व्यक्तिश: माहितीची मागणी केल्यानंतर माहिती अर्जासंदर्भातील घडामोडी जसेच माहितीचे शुल्क ज्ञात करुन घेणे, माहिती प्राप्त करुन घेणे इ. घडामोडी स्वत:हुन ज्ञात करुन घेणे अर्जदाराचे उत्तरदायित्व असते. आज सुनावणीदरम्यान उपस्थित जन माहिती अधिकारी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात प्रतिसाद देऊन कार्यवाही केली असल्याचे व अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे आणि अपिलार्थी यांनी माहिती प्राप्त करुन घेऊन पोच दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

उपरोक्त १२ व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3376 दिनांक : 11/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५४०३ ते ५४०६/२०२५ (०४)

श्री.भारत भिमराव दाभाडे,
रा.सहारा गोकुळधाम सोसायटी, विमान तळाच्या बाजुला, फ्लॅट नंबर ०२, १०३, जालना रोड, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
छत्रपती संभाजीनगर पाटबंधारे विभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
छत्रपती संभाजीनगर पाटबंधारे विभाग, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२५.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये चार द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, श्री.अभय आ.शेळके व प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, श्रीमती एस.जी.शहापुरे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या चार जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ५३ | ०९.०९.२०२५ | सन २०२३-२४ ते २०२५ या कालावधीमध्ये कामासाठी प्राप्त झालेला कामाची निविदा प्रक्रिया व ३३३३३३ कामाचे यादी व निविदा प्रक्रिया, अंदाजपत्रक, आदी स्वरुपाची माहिती, |
| ५४ | ०९.०९.२०२५ | सन २०२३-२४ ते २०२५ या कालावधीमध्ये कार्यालयीन खर्च, बंगल्याची दाग दुरुस्तीच्या कामाची अंदाजपत्रक व कामाचे अंदाजपत्रक, निविदा प्रक्रिया आदी स्वरुपाची माहिती, |
| ५५ | ०९.०९.२०२५ | सन २०२३-२४ ते २०२५ या कालावधीमध्ये कामासाठी प्राप्त झालेला निधी, लेखाशिर्षनिहाय किती निधी प्राप्त झाला व वाटप करण्यात आलेले कामे, त्याची यादी, त्याची निविदा प्रक्रिया व अंदाजपत्रक, नोंद केलेल्या रोकडवहीची छायांकित प्रत, आदी स्वरुपाची माहिती, |
| ५६ | ०९.०९.२०२५ | सन २०२३-२४ ते २०२५ या कालावधीमध्ये इंधन बिल, वाहनाचे १०९ बुक, साहित्य खरेदी केल्याची यादी व छायांकित बिल प्रत मिळणेबाबत आदी स्वरुपाची माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती सहायक जन माहिती अधिकारी यांनी सादर केली नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येणे शक्य झालेले नाही. संबंधित सहायक जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ लिपिक (सध्या कार्यरत - छत्रपती संभाजीनगर पाटबंधारे उपविभाग क्र.१, छत्रपती संभाजीनगर) यांनी त्यांचेकडील पदभार देखील हस्तांतरित केलेला नाही. या संदर्भात त्यांना कार्यालयाकडुन वारंवार कळविण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील अभिलेख संबंधित सहायक जन माहिती अधिकारी यांच्या ताब्यात असल्यागुळे व त्यांनी त्यांचेकडील पदभार हस्तांतरित केला नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येणे शक्य होत नाही. अपिलार्थी यांनी

मागणी केलेली माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याकरिता काही कालावधी उपलब्ध करुन देण्यात यावा. असा कालावधी उपलब्ध करुन दिल्यास अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती संबंधित सहायक जन माहिती अधिकारी यांच्याकडुन प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांचे प्रथम अपिलाचे अर्ज संबंधित सहायक जन माहिती अधिकारी यांनी निदर्शनास आणून न दिल्यामुळे सदर प्रथम अपिलावर कार्यवाही करता येणे शक्य झालेले नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जांसंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप विचारात घेता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम २ (J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्र.०१, सिंचन भवन, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग क्र.०१, सिंचन भवन, छत्रपती संभाजीनगर व संबंधित सहायक जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ लिपिक (सध्या कार्यरत छत्रपती संभाजीनगर पाटबंधारे उपविभाग क्र.१, छत्रपती संभाजीनगर) यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत कार्यवाही केलेली नसून माहितीचा अर्ज योग्य पध्दतीने हाताळलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.०७.०४.२०२६ रोजी वेळ दुपारी ०२.०० वा. आयोगासमोर व्यक्तिश:** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या **दि.१६.१०.२०२५** रोजीच्या **चार** प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. उपरोक्त निर्देशासह चार व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3169 दिनांक :- 6/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,

अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५८४ ते ५८६/२०२५ (०३)

श्री.गणेश मोहनराव सोनवणे,
रा.प्लॉट नंबर ९६, गल्ली क्र.११, न्यायनगर, गारखेडा परिसर,
छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
अधीक्षक,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, लाभक्षेत्र विकास भवन, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक अधीक्षक अभियंता,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, लाभक्षेत्र विकास भवन, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०५.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये तीन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, श्री.वा.वि.गजभिव व प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक अधीक्षक अभियंता, श्री.प्रसाद क. सोमवंशी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या तीन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ५७ | ०१.०७.२०२४ | अ. लाभक्षेत्र विकास प्राधिकरणांतर्गत मुख्य दप्तर कारकून, वरिष्ट दप्तर कारकून, दप्तर कारकून, कालवा निरीक्षक व मोजणीदार यांचे कर्तव्य व जवाबदारी ज्या नियमात / शासन निर्णयात / परिपत्रकात / शासन निर्देशात ठरवून दिलेली आहे त्या अभिलेखाची छायांकित व प्रमाणित प्रत,<br>ब. दप्तर कारकून हे पद उपविभाग / शाखेत असताना त्यांना कार्यक्षेत्रावरील बिट पाहण्याचे काम ज्या नियमात / शासन निर्णयात / परिपत्रकात / शासन निर्देशानुसार देण्यात येतात त्याची छायांकित व प्रमाणित प्रत, दि.०१.०१.२०२३ ते आजपर्यंत, |
| ५८ | ०१.०७.२०२४ | अ. लाभक्षेत्र विकास प्राधिकरणांतर्गत मुख्य दप्तर कारकून, वरिष्ट दप्तर कारकून, दप्तर कारकून, कालवा निरीक्षक व मोजणीदार यांच्या बदल्या / प्रतिनियुक्ती करण्याचे अधिकार ज्या अधिसुचनेनुसार / नियमानुसार / शासन निर्णय / परिपत्रकानुसार / अधीक्षक अभियंता यांनी प्रदान केलेल्या अधिकारानुसार कार्यकारी |

| | | |
|---|---|---|
| | | अभियंता या पदास प्रदान केलेले आहे त्या अधिसुचनेची / नियमाची / शासन निर्णय / परिपत्रकाची / अधीक्षक अभियंता यांचे निर्देशाची छायांकित व प्रमाणित प्रत, दि.०१.०१.२०२२ ते आजपर्यंत, |
| ५९ | ०१.०७.२०२४ | लाभक्षेत्र विकास प्राधिकरणांतर्गत कार्यरत कर्मचारी हे कामावर हजर असताना, कामावर हजर राहुन शासकीय कामकाज पार पाडले असताना, अधिनस्त कार्यालयाकडुन उपस्थिती अहवाल प्राप्त झालेला असताना कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन अदा न करणेबाबत तरतुद असलेल्या शासन नियमाची / निर्णयाची / परिपत्रकाची / शासन पत्राची / प्राधिकरणाने कार्यकारी अभियंता यांना दिलेल्या निर्देशाची छायांकित व प्रमाणित प्रत, दि.०१.०१.२०२३ ते आजपर्यंत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अपिलार्थी यांच्या बोर्ड क्र.५७, ५८ व ५९ मधील माहिती अर्जाच्या अनुषंगाने अनुक्रमे दि.३०.०७.२०२४, दि.२५.०७.२०२४ व दि.२५.०७.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, मागणी केलेली माहिती संकेतस्थळावर सर्व नागरिकांसाठी उपलब्ध असल्याने ती माहिती अधिकारात पुन:श्च देण्याची आवश्यकता नसल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी हे पाटबंधारे विभागाचे कर्मचारी असुन ते माहिती अधिकारातंर्गत कार्यालयाशी संबंधित माहितीची मागणी करत आहेत.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या तीनही प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती दिशाभूल करणारी व चुकीची आहे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात मागणी केलेली माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे अपिलार्थीस कळविले असल्याचे दिसुन येत आहे. जी माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे ती माहिती कागदपत्र स्वरुपात उपलब्ध करुन देण्याचे आवश्यकता नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त तीन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3292 दिनांक : 6/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ८४२/२०२५
बोर्ड क्र.६०

श्री.रामचंद्र रंगनाथ जाधव, — अपिलार्थी
रा.कैलासनगर, गल्ली नंबर ०१ (पश्चिम), घर क्र.अ-२१, मंगल निवास, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उपकार्यकारी अभियंता,
छत्रपती संभाजीनगर पाटबंधारे विभाग, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
छत्रपती संभाजीनगर पाटबंधारे विभाग, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२४.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, श्री.अभय आ.शेळके व प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, श्रीमती एस.जी.शहापुरे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १०.१०.२०२४ | आपले विभागाने अधिनस्त उपविभागाचे कार्यक्षेत्रातील सिंचन प्रकल्पासाठी Carrying out Irrigation management work including of canal, measurement of area, preparation of record in rabbi and hot weather season या कामाचे अंदाजपत्रक, निविदा, कार्यारंभ आदेश, प्राधिकरण कार्यालयाचा निधी उपलब्ध आदेश, सदर देयक ज्या मोजमाप पुस्तिकेत दर्शविले त्या मोजमाप पुस्तिकेच्या संबंधित पृष्ठांचे व छायांकित व प्रमाणित प्रत, दि.०१.०१.२०२० ते आजपर्यंत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती व प्रथम अपील अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप विचारात घेता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम २ (J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक टरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, छत्रपती संभाजीनगर लघुपाटबंधारे विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. **तत्कालीन जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता, छत्रपती संभाजीनगर लघुपाटबंधारे विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत कार्यवाही केलेली नसून माहितीचा अर्ज योग्य पध्दतीने हाताळलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.०७.०४.२०२६ रोजी वेळ दुपारी ०२.०० वा. आयोगासमोर व्यक्तिश:** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.३१.१२.२०२४ रोजीच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी कलम १९ (६) चा भंग दिसून येत आहे. म्हणून त्यांचेविरुध्द शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१.०३.२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

४. अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 3163 दिनांक : 6/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १०५०/२०२५
बोर्ड क्र.६१

श्री.नामदेव बाबुराव काकडे,
रा.एल.आय.जी. बी.४३/०५, साईनगर, सिडको, वडगाव कोल्हाटी, वाळुज एरिया, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
मालमत्ता व अतिक्रमण विभाग, शहर व औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य, ग्रोथ सेंटर वाळुज एरिया, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्रशासक,
शहर व औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य, ग्रोथ सेंटर वाळुज एरिया, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.११.०३.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २५.११.२०२४ | आपणास दि.२८.०६.२०२३ रोजी आमच्या जागेवर होत असलेल्या अतिक्रमणाबाबत मी व बबन थोरात दोघांनी पत्र दिले होते, या पत्राला एक वर्षाहुन जास्त दिवस म्हणजेच १४ महिने पूर्ण होऊनही आपणाकडुन कुठल्याही प्रकारची दखल घेण्यात आलेली नाही,<br>श्रीराम प्लाझामधील रहिवाशांनी या जागेवर तारेचें कंपाऊंड सिमेंटमध्ये लोखंडी रॉड लावुन पूर्ण जागा ताब्यात घेतली आहे तसेच या सेप्टीक टँकमध्ये पाणी सोडलेले आहे,<br>आपणाकडे पत्र देऊन १४ महिने झाले तरी आपण आजपर्यंत या पत्राचे उत्तर दिलेले नाही आपण या पत्राचे उत्तर ठरवून दिलेल्या वेळेत द्याल, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दि.१८.०२.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, सात दिवसात माहिती उपलबध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि या नंतरही माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. सदर माहिती अर्जान्वये

मागणी केलेल्या माहितीची नितांत आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाची गांभिर्याने दखल घेतली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमातील तरतुदीनुसार यथोचित कारवाई प्रस्तावित करण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, उत्तर मिळाले नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, मालमत्ता व अतिक्रमण विभाग, शहर व औद्योगिक विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, मालमत्ता व अतिक्रमण विभाग, शहर व औद्योगिक विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत कार्यवाही केलेली नसून माहितीचा अर्ज योग्य पध्दतीने हाताळलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.०७.०४.२०२६ रोजी वेळ दुपारी ०२.०० वा. आयोगासमोर व्यक्तिशः** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. प्रशासक, शहर व औद्योगिक विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3164 दिनांक : 6/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १९२३/२०२५
बोर्ड क्र.६२

श्रीमती जुबेदा बेगम इब्राहिम पठाण,
रा.मौलाना आझाद कॉलेज समोर, नॅशनल कॉलनी, प्लॉट नंबर २४, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक अतिक्रमण अधिकारी,
सिडको शहर औद्योगिक विकास महामंडळ, उद्योग भवन, नवीन छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्रशासक,
सिडको शहर व औद्योगिक विकास महामंडळ, उद्योग भवन, नवीन छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१४.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १३.१२.२०२४ | आपल्या महामंडळ (सिडको) अंतर्गत येणाऱ्या सर्व प्रकारच्या बांधकामांबाबत ०४ मुद्यांवर माहिती, सन २०२० ते आजपर्यंत, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध कागदपत्रावरुन होत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२७.०२.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसुन येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, नियमाप्रमाणे जी माहिती उपलब्ध असेल ती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि सदर प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे दिसुन येत नाही. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी

माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहायक अतिक्रमण अधिकारी, सिडको शहर व औद्योगिक विकास महामंडळ, उद्योग भवन, नवीन छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक अतिक्रमण अधिकारी, सिडको शहर व औद्योगिक विकास महामंडळ, उद्योग भवन, नवीन छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत कार्यवाही केलेली नसून माहितीचा अर्ज योग्य पध्दतीने हाताळलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.०७.०४.२०२६ रोजी वेळ दुपारी ०२.०० वा. आयोगासमोर व्यक्तिश:** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. प्रशासक, सिडको शहर व औद्योगिक विकास महामंडळ, उद्योग भवन, नवीन छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3165 दिनांक : 6/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ३९१९/२०२५
बोर्ड क्र.६३

श्री.सुधीर मधुकर गुरव,
रा.एन-०९, के-७५/१, २, पवन नगर, हडको, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
शहर औद्योगिक विकास महामंडळ मर्या., छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्रशासक,
शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्या., छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२२.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०३.०३.२०२५ | घर क्र.एन-९-के-६३-०८ सिडको, छत्रपती संभाजीनगर चे मूळ मालकी हक्काचे कागदपत्र मिळणेबाबत, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, प्राप्त आदेश पूर्णत: समाधानकारक नसल्याकारणाने, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात दि.०२.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील मालमत्ता अर्जदार यांचे नावे नसल्यामुळे व कलम ११ (३) या नियमाखाली त्रयस्थ व्यक्ती असल्याने माहिती देता येणार नसल्याचे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२६.०५.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे व अपिलार्थी यांनी न्यायालयाकडुन पत्र प्राप्त करुन घेऊन माहिती प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद आणि

अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचार करता प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.०८.०४.२०२५ रोजीच्या प्रथम अपिलावर दि.२६.०५.२०२५ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 3291 दिनांक : 6/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४९२५ ते ४९२८/२०२५ (०४)

श्री.उध्दव गोवर्धन बनसोडे,
रा.घर नंबर ७/५५, डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर, फुलेनगर, ग्रीव्हज् कंपनी रोड, सिडको, एन-०७, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
पणन विभाग, शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित, सिडको, उद्योग भवन, नवीन छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्रशासक,
शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित, सिडको, उद्योग भवन, नवीन छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.३१.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये चार द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या चार जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ६४ | २६.०३.२०२५ | १. मा.प्रशासक सिडको यांचे स्वाक्षरीत दि.०४.०३.२०२५ चे पत्र क्र.सिडको/पणन/ छ.सं./२०२५/९६७ मधील मजकूर असा की, माध्यम कोणते असावे हा शिक्षण विभागाचा अधिकार आहे, हा मजकूर ज्या पुराव्याआधारे आहे त्या सर्व संचिका, कागदपत्राची झेरॉक्स प्रत,<br>२. मा.प्रशासक सिडको यांचे स्वाक्षरीत दि.०४.०३.२०२५ चे पत्र क्र.सिडको / पणन / छ.सं./२०२५/९६७ मधील मजकूर असा की, शिक्षण विभागाने दि.१५.०६.२०१३ च्या शासन निर्णयानुसार इंग्रजी माध्यमास परवानगी दिली आहे, हा मजकूर ज्या पुराव्याआधारे आहे त्या सर्व संचिका, कागदपत्राची झेरॉक्स प्रत द्यावी, |
| ६५ | २६.०३.२०२५ | १. मा.प्रशासक सिडको यांचे स्वाक्षरीत दि.०४.०३.२०२५ चे पत्र क्र.सिडको / पणन / छ.सं./२०२५/९६७ मधील मजकूर असा की, शासन परिपत्रक क्र.आस्था-२०२५ / ई९१४६९५ / विशि-१, दि.१८.०२.२०२५ अन्वये शासन निर्देश लक्षात घेता ज्या पुराव्याआधारे आहे त्या सर्व संचिका, कागदपत्राची झेरॉक्स प्रत द्यावी,<br>२. मा.प्रशासक सिडको यांचे स्वाक्षरीत दि.०४.०३.२०२५ चे पत्र क्र.सिडको / पणन |

| | | |
|---|---|---|
| | | / छ.सं./२०२५/९६७ मधील मजकूर असा की, संदर्भ :-३ आपले पत्र क्र.१०२, दि.२२.०१.२०२५ हा मजकूर ज्या पुराव्याआधारे आहे त्या सर्व संचिका कागदपत्राची झेरॉक्स प्रत द्यावी, |
| ६६ | २६.०३.२०२५ | १. मा.प्रशासक सिडको यांचे स्वाक्षरीत दि.०४.०३.२०२५ चे पत्र क्र.सिडको / पणन / छ.सं./२०२५/९६७ मधील मजकूर असा की, दि.२८.०२.२००६ रोजी संस्थेने इमारत जुनी झाल्याने बांधकाम परवानगी विभागाकडे सुधारित बांधकाम परवानगीसाठी अर्ज केला होता, हा मजकूर ज्या पुराव्याआधारे आहे त्या सर्व संचिका, कागदपत्राची झेरॉक्स प्रत द्यावी,<br>२. मा.प्रशासक सिडको यांचे स्वाक्षरीत दि.०४.०३.२०२५ चे पत्र क्र.सिडको / पणन / छ.सं. / २०२५ / ९६७ मधील मजकूर असा की, मा.उच्च न्यायालयाचे रिट याचिका क्रमांक २४९२ / २००४ दि.२३.१०.२०२४ मधील निर्देशाचे अनुषंगाने, हा मजकूर ज्या पुराव्या आधारे आहे त्या सर्व संचिका कागदपत्राची झेरॉक्स प्रत, |
| ६७ | २६.०३.२०२५ | १. मा.प्रशासक सिडको यांचे स्वाक्षरीत दि.०४.०३.२०२५ चे पत्र क्र. सिडको / पणन / छ.सं. / २०२५ / ९६७ मधील मजकूर असा की, जागेवरील शैक्षणिक वापर पाहता त्यामध्ये बदल झालेला नाही, हा मजकूर ज्या पुराव्याआधारे आहे त्या सर्व संचिका, कागदपत्राची झेरॉक्स प्रत द्यावी,<br>२. मा.प्रशासक सिडको यांचे स्वाक्षरीत दि.०४.०३.२०२५ चे पत्र क्र. सिडको / पणन /छ.सं. / २०२५ / ९६७ मधील मजकूर असा की, संस्थेने दि.१४.०६.२०११ रोजी सिडकोकडुन ना-हरकत प्रमाणपत्र घेऊन महापालिकेकडुन दि.२९.०२.२०१२ रोजी भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त केले आहे, हा मजकूर ज्या पुराव्या आधारे आहे त्या सर्व संचिका, कागदपत्राची झेरॉक्स प्रत द्यावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दि.०९.०६.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, सात दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि या नंतरही माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. सदर माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीची नितांत आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाची गांभिर्याने दखल घेतली नसल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमातील तरतुदीनुसार यथोचित कारवाई प्रस्तावित करण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती नाकारली, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या अनुक्रमे माहिती अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत सुसंगत कार्यवाही केलेली नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप विचारात घेता, अशी माहिती अपिलार्थीस अधिनियमातील कलम २ (J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा पणन विभाग, शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्या., सिडको, उद्योग भवन, नवीन छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद चारही जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली प्रति माहिती अर्ज ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना प्रति माहिती अर्ज ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, पणन विभाग, शहर व औद्योगिक विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत कार्यवाही केलेली नसून माहितीचा अर्ज योग्य पध्दतीने हाताळलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.०७.०४.२०२६ रोजी वेळ दुपारी ०२.०० वा. आयोगासमोर व्यक्तिश: उपस्थित** राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. प्रशासक, शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्या., सिडको, उद्योग भवन, नवीन छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह चार व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.-3167- दिनांक :-6/3/2026-नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५८२३/२०२५
बोर्ड क्र.६८

श्रीमती आम्रपाली किशोर मोकळे,
रा.घर क्र. ई-२७/१३, एन-०६, सिडको, संभाजी कॉलनी,
छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
मालमत्ता विभाग, सिडको कार्यालय, उद्योग भवन, नवीन
छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्रशासक,
सिडको कार्यालय, उद्योग भवन, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१८.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०४.०९.२०२५ | १. सिडको एन-१ येथील सिडको अधिकारी / कर्मचारी साठी किती सदनिका राखीव ठेवलेल्या आहेत, २. सदर सदनिका सिडकोच्या कोणत्या पदाधिकारासाठी ठेवण्यात आल्या होत्या, जसे की, प्रशासक / सहायक वसाहत अधिकारी, सहायक पणन अधिकारी, सहा.नियोजन अधिकारी, कार्यकारी अभियंता किंवा इतर पदाचे नाव, ३. या सदनिकेसाठी सिडको प्रशासक मंडळाचे काय नियम, अटी, शर्ती होत्या त्याची सविस्तर माहिती, ४. सदर सदनिकेचे दर ठरविण्याचे अधिकार कुणाला आहेत त्यामध्ये वेळोवेळी काही बदल झाले आहेत काय, याबाबतची सविस्तर माहिती, ५. सदनिका / प्लॉट क्र.१०९ ही सध्याचे सहायक वसाहत अधिकारी यांना कोणत्या नियमानुसार वाटप झाले, यामध्ये वाटप होण्याअगोदर सदनिका वाटप करतेवळेस सिडको प्रशासक मंडळाची मंजुरी घेतली होती का, त्यावेळेस प्रशासकीय मान्यता कोणत्या प्रशासकाने दिली त्या संचिकेची पूर्ण छायांकित प्रतीसह सविस्तर माहिती द्यावी, ६. सदनिका / प्लॉट क्र.१०९ साठी कोणकोणत्या अधिकाऱ्यांनी मागणी केली होती, त्यामधुन सदनिका / प्लॉट क्र.१०९, सध्याचे सहा.वसाहत अधिकारी यांनाच देण्याबाबत ठराव कोणी पास केला व कोणत्या नियमात केला, त्याबाबत ठरावाची छायांकित प्रत, ७. सदनिका / प्लॉट क्र.१०९ लिज डिडसाठी सिडकोच्या संचालक मंडळाची मंजुरी घेतली आहे का, याबाबत पूर्ण |

| | प्रशासकीय कार्यवाहीची छायांकित प्रत प्रमाणित करुन देण्यात यावी. |
|---|---|

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध आयोगापुढील कागदपत्रावरुन होत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२९.०९.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसुन येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक व मोघम स्वरुपाची असल्यामुळे माहिती देता येत नसल्याचा निष्कर्ष काढुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कार्यालयात माहिती उपलब्ध असताना जाणुन बुजून माहिती देण्यास टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ठ होत असल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती जरी प्रश्नार्थक स्वरुपाची असली तरी अपिलार्थी यांनी विचारणा केलेल्या प्रश्नाचे उत्तर अभिलेखात अभिलेख स्वरुपात उपलब्ध असल्यास ते उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचार न करता अपिलार्थीने मागणी केलेली माहिती मोघम, प्रश्नार्थक स्वरुपाची असल्याचा निष्कर्ष काढुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे. ही बाब आयोगास योग्य वाटत नाही. सबब, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२९.०९.२०२५ रोजी पारित केलेला निर्णय अधिक्रमित करुन आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

अत:, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

<u>आदेश</u>

१. वर्तमान जन माहिती अधिकारी, मालमत्ता विभाग, सिडको, उद्योग भवन, नवीन छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी, मालमत्ता विभाग, सिडको, उद्योग भवन, नवीन छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत कार्यवाही केलेली नसून माहितीचा अर्ज योग्य पध्दतीने हाताळलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह दि.०७.०४.२०२६ रोजी वेळ दुपारी ०२.०० वा. आयोगासमोर व्यक्तिश: उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. प्रशासक, मालमत्ता विभाग, सिडको, उद्योग भवन, नवीन छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

५/३/२६

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.3171 दिनांक :- 6/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३४०४/२०२५**
**बोर्ड क्र.७०**

श्री.सय्यद नवाज सय्यद सुरवर,
रा.गट नंबर १३, प्लॉट नंबर २०६, पटेलनगर, नारेगाव,
छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
प्रशासकीय अधिकारी,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, घाटी,
छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, घाटी,
छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२५.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.विनायक वाडीकर, कार्यालयीन अधीक्षक, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, डॉ.प्रसाद देशपांडे, प्राध्यापक व विभाग प्रमुख मनोविकृतीशास्त्र उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १२.०५.२०२५ | श्री.शेख इरफान सरवर रा.उज्जैनपुरी, ता.बदनापूर, जि.जालना यांनी आपल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे पीजी मध्ये एमडी जन मेडिसीन या अभ्यासक्रमासाठी मुस्लिम तेली (ओबीसी) या राखीव प्रवर्गातुन प्रवेश घेतलेला आहे. तरी नामे श्री.शेख इरफान सरवर यांनी आपल्या वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेताना जी कागदपत्रे सादर केली होती, जसे की प्रवेश अर्ज व त्या सोबत दिलेली जातवैधता प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत देण्यात यावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती

अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.२७.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस, मागणी केलेली माहिती वैयक्तिक तपशिलासंबंधित खाजगी स्वरुपाची असल्यामुळे अशी माहिती कलम ८ (१) (त्र) व शासन परिपत्रक दि.१७.१०.२०१४ नुसार देय होत नाही, अशी वस्तुस्थिती अपिलार्थीस अवगत केलेली आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०१.०७.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास नकार, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थीस कळविली असल्याचे दिसुन येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अधिनियमातील तरतुदी या सर्व बाबींचा सारसार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.०२.०६.२०२५ रोजीच्या प्रथम अपिलावर दि.०१.०७.२०२५ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3290 दिनांक : 6/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४४०४/२०२५
बोर्ड क्र.७१

गं.भा. अनघा अनिल पालकर,
रा.कुलकर्णी गल्ली, पालकर निवास, वैजापूर,
ता.वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
प्रशासकीय अधिकारी,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, घाटी,
छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, घाटी,
छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२४.०९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.राजेंद्र मोरे, कार्यालयीन अधीक्षक, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, डॉ.प्रसाद देशपांडे, प्राध्यापक व विभाग प्रमुख मनोविकृत्तीशास्त्र उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १३.०६.२०२५ | क्लार्क आस्थापना विभागातील अनिल दत्तात्रय पालकर यांचे सेवापुस्तक उपलब्ध करुन देणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर मागणी केलेली माहिती पतीशी संबंधित आहे. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती यापूर्वी त्यांना व्हॉटअॅपव्दारे पुरिवण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१४.०१.२०२६ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा शोध घेऊन सदर माहिती १५ दिवसात उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन जन माहिती

अधिकारी यांनी त्यांच्या दि.१९.०१.२०२६ रोजीच्या पत्रासोबत अपिलार्थी यांनी मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली ४९ पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त झाली नसल्यास सदर माहिती अपिलार्थीस पुन:श्च उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही अनुसरण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१४.०१.२०२६ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती व जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद याचा सारासार विचार करुन १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांन आदेशित केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळणे, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, घाटी, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, घाटी, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3289 दिनांक : 6/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५१४०/२०२५
बोर्ड क्र.७२

श्री.प्रविण अशोक शिंदे,
रा.घर नंबर ०४-०४-१०१, किराणा चावडी रोड, बँक ऑफ महाराष्ट्र जवळ, चौराहा, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ १.१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्य प्रशासकीय अधिकारी,
प्रादेशिक कार्यालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय परिसर, मध्यवर्ती ग्रंथालय, १ ला मजला, पानचक्की रोड, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

१.२ जन माहिती अधिकारी तथा
प्रशासकीय अधिकारी,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर

१.३ जन माहिती अधिकारी तथा
प्रशासकीय अधिकारी,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

१.३ जन माहिती अधिकारी तथा
प्रशासकीय अधिकारी,
शासकीय कर्करोग रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहसंचालक,
प्रादेशिक कार्यालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय परिसर, मध्यवर्ती ग्रंथालय, १ ला मजला, पानचक्की रोड, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.११.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २९.०७.२०२५ | शासकीय कर्क रुग्णालय व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय छत्रपती संभाजीनगर येथे दि.२७.०४.२०२५ रोजी बिम युनिटच्या उद्घाटन कार्यक्रमावर खर्च झालेल्या रकमेची देयकांची मागील व पुढील बाजुची छायांकित प्रती मिळण्याबाबत, दि.०१.०४.२०२५ ते दि.२९.०७.२०२५,<br>१. वरील विषयाप्रमाणे कार्यक्रमासाठी एकूण किती खर्च झाला त्या देयकाची मागील पुढील बाजुची छायांकित प्रत देण्यात यावी,<br>२. रक्कम अदा करण्यात आली (रु.१३,६६,६०९/- व रु.१९,६४,६५८/-) याचा आरटीजीएस व ट्रान्सफर नंबर ची प्रत देण्यात यावी,<br>३. बोधनकर इव्हेंट एलएलपी कंपनीला एकुण रु.३३,३१,२६७/- अदा करण्यात आले त्या संपूर्ण देयकाची मागील व पुढील बाजुची छायांकित प्रती देण्यात याव्या, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर मागणी केलेली माहिती व्यापक जनहिताशी संबंधित असल्यामुळे व सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, छत्रपती संभाजीनगर यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांचा मूळ माहितीचा अर्ज सहसंचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयाकडे सादर केलेला आहे. तथापि अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय व शासकीय कर्करोग रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयाशी निगडित असल्यामुळे अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज दि.३०.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये संबंधित दोनही कार्यालयाकडे आवश्यक त्या पुढील कार्यवाहीकरिता पाठविण्यात आलेला आहे.

जन माहिती अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाकडे हस्तांतरित झालेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.१३.१०.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहसंचालक, प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना असे कळविण्यात आलेले आहे की, माहिती अर्जात नमूद माहितीच्या अनुषंगाने बिम युनिट उद्घाटन कार्यक्रमावर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय या संस्थेकडुन कोणताही खर्च करण्यात आलेला नाही.

जन माहिती अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाकडे हस्तांतरित झालेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.१५.१०.२०२५ रोजीच्या पत्रासोबत, मागणी केलेली माहिती वस्तु भांडार विभागाशी संबंधित नसल्याचे व बिम युनिट उद्घाटन कार्यक्रमावर कोणताही खर्च करण्यात आला नसल्याचे अपिलार्थी यांना अवगत करण्यात आलेले आहे.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व कर्करोग रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या शासकीय कर्करोग रुग्णालयास हस्तांतरित झालेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद दिला किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. तथापि प्रस्तुत प्रकरणाच्या सुनावणीबाबत सहसंचालक, प्रादेशिक कार्यालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडुन प्राप्त झालेल्या निर्देशानुसार अपिलार्थीस हव्या असलेल्या माहितीची शहानिशा केली असता असे निदर्शनास येत आहे की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने कोणतेही देयक शासकीय कर्करोग रुग्णालयाकडुन प्रमाणित करण्यात आलेले नसून कोणत्याही लेखाशिर्षातुन खर्च करण्यात आलेला नाही. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जात नमूद देयकाचा खर्च एच.एस.सी.सी. (इंडिया) लिमिटेड या कंपनीकडुन करण्यात आलेला आहे. आज रोजीच्या सुनावणीच्या अनुषंगाने अपिलार्थी यांच्या माहिती अर्जातील अशी वस्तुस्थिती सहसंचालक, प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना दि.१९.०१.२०२६ रोजीच्या पत्रान्वये अवगत करण्यात आलेली आहे. तसेच अपिलार्थी यांच्या माहिती अर्जातील अशी वस्तुस्थिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही अनुसरण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांचा सहसंचालक, प्रादेशिक कार्यालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, छत्रपती संभाजीनगर कार्यालयास प्राप्त झालेला माहितीचा अर्ज माहितीशी संबंधित कार्यालयाकडे आवश्यक त्या पुढील कार्यवाहीकरिता किंवा माहितीचे प्रदान होण्याच्या दृष्टीकोनातून संबंधित कार्यालयाकडे हस्तांतरित करण्यात आलेला आहे. अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज ज्या कार्यालयाकडे हस्तांतरित झालेला आहे त्या कार्यालयातील पदनिर्देशित प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे अपिलार्थी यांनी प्रथम अपील करणे व अशा प्रथम अपिलावर संबंधित प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे अपेक्षित आहे. अपिलार्थी यांनी सहसंचालक कार्यालयाकडे दि.०८.१०.२०२५ रोजी सादर केलेल्या प्रथम अपिलाच्या दि.३१.१०.२०२५ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, शासकीय कर्करोग रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर यांना तात्काळ अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याचे निर्देशित करण्यात आलेले आहे. तथापि सदर शासकीय कर्करोग रुग्णालयाकडुन माहिती अथवा माहितीसंदर्भातील वस्तुस्थितीचे अद्याप अपिलार्थीस प्रदान झाले असल्याचे निदर्शनास येत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी सहसंचालक कार्यालयाकडे सादर केलेल्या माहितीचे अर्जाचे संबंधित कार्यालयाकडे हस्तांतरण झालेले आहे. त्या अनुषंगाने शासकीय कर्करोग रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर कार्यालय वगळता इतर कार्यालयाकडुन माहिती / वस्तुस्थितीचे प्रदान अपिलार्थीस झाले असल्याचे दिसुन येत आहे. तथापि संबंधित शासकीय कर्करोग रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयाकडुन अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत हाताळला असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, शासकीय कर्करोग रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. **तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, शासकीय कर्करोग रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर** यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत कार्यवाही केलेली नसून माहितीचा अर्ज योग्य पध्दतीने हाताळलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.०७.०४.२०२६ रोजी वेळ दुपारी ०२.०० वा. आयोगासमोर व्यक्तिशः** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. सहसंचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्रशाइं

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

जा.क्र. 3168 दिनांक : 6/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १५६/२०२५
बोर्ड क्र.७३

श्री.अशोक मोतीराम सुरवाडे,
रा.खर्डी (स्टेशन), ता.शहापूर, जि.ठाणे — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्य प्रशासकीय अधिकारी,
उपसंचालक आरोग्य सेवा परिमंडळ, महावीर चौक, बाबा पेट्रोल पंपासमोर, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
आरोग्य सेवा परिमंडळ, महावीर चौक, बाबा पेट्रोल पंपासमोर, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०९.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, डॉ.राहुल चव्हाण व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, डॉ.भुषणकुमार रामटेके उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०१.०६.२०२४ | १. जानेवारी २०२१ ते मे २०२४ या कालावधीत कनिष्ठ लिपिक संवर्गातुन वरिष्ठ लिपिक संवर्गात पदोन्नती बाबत वापरण्यात आलेली कनिष्ठ लिपिक संवर्गाची ज्येष्ठता यादी,<br>२. पदोन्नती निवड समिती सादर करण्यात आलेल्या पदोन्नतीच्या विचार क्षेत्रातील कर्मचाऱ्यांच्या माहितीचे तपशिलवार विवरणपत्र व त्यावर निवड समितीने दिलेले अभिप्राय,<br>३. पदोन्नती निवड समितीचे इतिवृत्त, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात दि.०५.०८.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, अपिलार्थी यांनी मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती दि.२७.०८.२०२४ रोजी नोंदणीकृत टपालाव्दारे अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीशिवाय दुसरी कोणतीही माहिती कार्यालयात उपलब्ध नाही. जी माहिती अभिलेखात उपलब्ध आहे ती सर्व माहिती अपिलार्थी यांना प्रदान करण्यात आलेली आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर

दि.०६.०९.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपूर्ण माहिती, असे कारण नमूद केलेले आहे. आज सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीसंदर्भात अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.-3288 दिनांक :- 6/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ७८९/२०२५
बोर्ड क्र.७४

श्री.शब्बीर खान हनीफ खान,
रा.आजम कॉलनी, दर्गा रोड, परभणी — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्य प्रशासकीय अधिकारी,
उपसंचालक आरोग्य सेवा परिमंडळ, महावीर चौक, बाबा पेट्रोल पंपासमोर, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
आरोग्य सेवा परिमंडळ, महावीर चौक, बाबा पेट्रोल पंपासमोर, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२०.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, डॉ.राहुल चव्हाण व प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, डॉ.कांचन वानेरे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २२.०७.२०२४ | आपले कार्यालयात मा.राज्य माहिती आयुक्त खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयाचे आदेश जा.क्र.व्दि.अ.४७४८सी/२०२३/एस/८९१३, दि.२२.०५.२०२४ रोजीच्या मध्ये तसे स्वयंस्पष्ट नमूद केल्याप्रमाणे आपले कार्यालयाने त्यांच्या आदेशाच्या दिनांकापासुन ते आजपर्यंत जी कार्यवाही केली त्या कार्यवाही व पत्राची संपूर्ण झेरॉक्स प्रत साक्षांकित करुन द्यावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी आयोगाकडील निर्णयानुसार कार्यालयाकडुन करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती माहिती अर्जाव्दारे मागितलेली आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.०५.०८.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, आयोगाकडील निर्णय अद्याप कार्यालयास अप्राप्त असल्यामुळे माहिती उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस कळविण्यात आलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१९.११.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे अपिलार्थी यांच्या

माहिती अर्जात नमूद व्दितीय अपिलाबाबत वरिष्ठ कार्यालयास कळविण्याचे जन माहिती अधिकारी यांना निर्देशित करण्यात आलेले आहे. अत: अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात नमूद व्दितीय अपिलाबाबतची वस्तुस्थितीदर्शक माहिती वर्तमान जन माहिती अधिकारी अपिलार्थीस उपलब्ध करुन देतील, ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिश: पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, सुनावणी घेतली नाही, माहिती मिळुन द्यावी, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, उपसंचालक आरोग्य सेवा परिमंडळ, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळ, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 3372 दिनांक :- 11/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १७२३, १७२४, ४४४७, ४४४८, ५५६१ व ५५६२/२०२५ (०६)

श्री.सय्यद सरफराज अली मन्सुर अली,
रा.घर क्र.४-१६-८४, ट्रेड युनियन सेंटर समोर, मिल कार्नर, कोतवालपुरा, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्य प्रशासकीय अधिकारी,
उपसंचालक आरोग्य सेवा परिमंडळ, महाविर चौक, बाबा पेट्रोल पंपासमोर, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
आरोग्य सेवा परिमंडळ, महाविर चौक, बाबा पेट्रोल पंपासमोर, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०२.०५.२०२५ (०२), दि.२९.०९.२०२५ (०२) व दि.०९.१२.२०२५ (०२) रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये सहा द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, डॉ.संदीप बांगडे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, डॉ.कांचन वानेरे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या सहा जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ७५ | १७.०३.२०२५ | उपसंचालक, आरोग्य सेवा, छ.संभाजीनगर यांचे पत्र (कारणे दाखवा नोटीस) जा.क्र. उसंआसे / आस्था ब-२ / श्री.सय्यद / औ.नि.अ. / ६३९४ - ४०० / २०२५, दि.०५.०३.२०२५ मध्ये कळविलेले आहे की, परीक्षेस बसण्याची नियुक्ती प्राधिकारी यांची परवानगी घेतली नसल्याने त्यांचे कार्यालयाकडुन कार्यमुक्त करता येणार नाही, वरीलप्रमाणे, महाराष्ट्र शासन अधिनस्त संस्थेतील कार्यालय प्रमुख वर्ग १ यांना त्यांच्या कार्यालयात कार्यरत वर्ग ३ तांत्रिक पदावरील कर्मचाऱ्यास महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागातील वर्ग ३ पदावरील परीक्षेस बसण्याची परवानगी घेतल्यावरही नियुक्ती प्राधिकारी यांना संबंधित कर्मचाऱ्याची कार्यमुक्ती प्रक्रिया थांबविण्याचे अधिकार असल्याबाबतचे शासकीय नियम स्पष्ट दर्शविणारे अभिलेखाची प्रत द्यावी, |

| | | |
|---|---|---|
| ७६ | १७.०३.२०२५ | उपसंचालक, आरोग्य सेवा, छ.संभाजीनगर यांचे पत्र (कारणे दाखवा नोटीस) जा.क्र. उसंआसे / आस्था ब-२ / श्री.सय्यद / औ.नि.अ. / ६३९४ - ४०० / २०२५, दि.०५.०३.२०२५ मध्ये कळविलेले आहे की, परीक्षेस बसण्याची नियुक्ती प्राधिकारी यांची परवानगी घेतली नसल्याने त्यांचे कार्यालयाकडुन कार्यमुक्त करता येणार नाही, वरीलप्रमाणे, महाराष्ट्र शासन अधिनस्त संस्थेतील कार्यालय प्रमुख वर्ग १ यांना त्यांच्या कार्यालयात कार्यरत वर्ग ३ तांत्रिक पदावरील कर्मचाऱ्यास महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागातील वर्ग ३ पदावरील परीक्षेस बसण्याची परवानगी घेतल्यावरही नियुक्ती प्राधिकारी यांना संबंधित कर्मचाऱ्याची कार्यमुक्ती प्रक्रिया थांबविण्याचे अधिकार असल्याबाबतचे शासकीय नियम स्पष्ट दर्शविणारे अभिलेखाची प्रत द्यावी, |
| ७७ | २४.०६.२०२५ | मी दिनांक ३०.०४.२०२५ रोजी आपल्या कार्यालयात माझे अर्ज (विषय-परीक्षा परवानगीस आणि कार्यमुक्ती प्रक्रियेस आपली कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत) सादर केले होते, तसेच या विषयी तात्काळ कार्यवाही करण्यासाठी दि.२९.०५.२०२५ रोजी पुन्हा अर्ज सादर केले होते, सोबत प्रत संलग्न करीत आहे, परंतू माझ्या सदरील अर्जाविषयी आपल्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती, |
| ७८ | २४.०६.२०२५ | मी दि.१२.०६.२०२५ रोजी आपल्या कार्यालयात माझे तक्रार अर्ज (विषय - तत्कालीन मा.उपसंचालक आरोग्य सेवा डॉ.भुषणकुमार रामटेके यांचे संदिग्ध कारभाराची तात्काळ उच्च स्तरीय समिती मार्फत चौकशी करुन कर्मचाऱ्याला व अधिकाऱ्याना न्याय देणेबाबत) सादर केले होते, सोबत प्रत संलग्न करीत आहे, परंतू माझ्या सदरील तक्रार अर्जाविषयी आपल्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती, |
| ७९ | १५.०९.२०२५ | वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रुग्णालय अंबड जि.जालना यांनी मला त्यांचे दि.१३.०९.२०२३ नुसार महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय मुंबईच्या अधिनस्त औषधनिर्माता या पदावर निवडीकरिता कागदपत्र पडताळणी व समुपदेशन प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे, सदरील ना-हरकत प्रमाणपत्राची प्रत आपल्या कार्यालयास दि.१५.०९.२०२३ रोजी प्राप्त झाली, या ना-हरकत प्रमाणपत्राच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची माहिती, |
| ८० | १५.०९.२०२५ | वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रुग्णालय अंबड, जि.जालना यांनी त्यांचे पत्र दि.०८.०४.२०२४ अनुसार माझे अंतिम वेतन प्रमाणपत्र व मूळ सेवापुस्तक त्यांचे कार्यालयातुन सध्याचे कार्यालय अधिष्ठाता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय जळगाव येथे पाठविले आहे, संबंधित कार्यालयाला हे अभिलेख दि.१९.०४.२०२४ रोजी प्राप्त झाले आहे, आपल्या कार्यालयाला सुध्दा वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा रुग्णालय, अंबड, जि.जालना यांनी त्याचवेळी सदरील पत्राची प्रत देऊन अवगत केले, तरी मूळ सेवा पुस्तक व अंतिम वेतन प्रमाणपत्र हस्तांतरित केल्याचे वरीलप्रमाणे उल्लेखित आपणास प्राप्त पत्राच्या अनुषंगाने आपल्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीच्या अनुशंगाने निर्मित अभिलेखाचे सर्व कागदपत्रांची साक्षांकित प्रत देण्यात यावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर मागणी केलेली माहिती स्वत:शी संबंधित आहे. सदर माहितीची नितांत आवश्यकता असुन सदर माहिती प्राप्त झाल्यास स्वत:वर होत असलेल्या अन्यायाविरुध्द सक्षम प्राधिकरणाकडे दाद मागता येणे शक्य होणार आहे. जन माहिती अधिकारी यांनी संकेतस्थळाचे अवलोकन करुन माहिती हस्तगत करण्याचे सुचित केलेले आहे. तथापि सुचित केल्याप्रमाणे संकेतस्थळाचे अवलोकन केला असता, हवी असलेली माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे निदर्शनास येत नाही. म्हणून मागणी केलेली माहिती अभिलेख स्वरुपात उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रतिसाद देऊन माहिती व वस्तुस्थिती अपिलार्थीस अवगत करण्यात आलेली आहे. जी माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे त्याबाबत संकेतस्थळ कळवून संकेतस्थळावरुन माहिती प्राप्त करण्याचे अपिलार्थीस सुचित करण्यात आलेले आहे. तसेच माहिती कार्यालयात उपलब्ध नाही त्याबाबत माहिती निरंक असल्याचे अपिलार्थीस सूचित करण्यात आलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वस्तुस्थितीदर्शक माहिती दिलेली आहे. तथापि दिलेल्या माहिती अथवा वस्तुस्थितीने अपिलार्थी यांचे समाधान झालेले नाही. अपिलार्थी हे आरोग्य विभागाचे कर्मचारी आहेत. या परिस्थितीत अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी कार्यवाही करतील, ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिश: पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन माहिती / माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थीस अवगत केली असल्याचे दिसुन येत आहे. तथापि उपलब्ध करुन दिलेल्या माहिती / वस्तुस्थितीने अपिलार्थी यांचे समाधान झालेले नाही. प्रसंगावशात, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीवरुन व आज रोजी आयोगासमोर केलेल्या युक्तिवादावरुन माहितीची मागणी करण्यामागे अपिलार्थी यांची त्यांच्या सेवाविषयक बाबीसंदर्भात काही तक्रार असल्याचे व या बाबत अपिलार्थी यांना माहिती अधिकारातंर्गत त्यांच्या सेवाविषयक बाबीसंदर्भात प्रशासकीय कार्यवाहीची अपेक्षा असल्याचे दिसुन येत आहे. तथापि अशी बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ट होत नसल्याने अपिलार्थी यांनी त्यांच्या तक्रारीबाबत / प्रशासकीय कार्यवाहीबाबत संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे देखील संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, उपसंचालक आरोग्य सेवा परिमंडळ, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद सर्व जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली प्रति माहिती अर्ज ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्यास किंवा उपलब्ध करुन देता येत नसल्यास तसे वस्तुस्थितीसह (माहिती का उपलब्ध नाही किंवा माहिती का उपलब्ध करुन देता येत नाही) अपिलार्थीस कळविण्यात यावे.

२. उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळ, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह सदृ व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(स्वाक्षरी)

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3375 दिनांक : 11/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५८९४/२०२५**
**बोर्ड क्र.८१**

श्री.अजितदादा किसनलालजी कोठारी, — अपिलार्थी
रा.प्रकाश रेसिडेन्सी, लक्ष्मीनारायणपुरा, मस्तगड, जालना

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
मुख्य प्रशासकीय अधिकारी,
उपसंचालक आरोग्य सेवा, महावीर चौक, बाबा पेट्रोल पंपासमोर, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपसंचालक,
आरोग्य सेवा, महावीर चौक, बाबा पेट्रोल पंपासमोर, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२२.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, डॉ.कांचन वानेरे उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १३.०७.२०२५ | राज्य माहिती आयोग महाराष्ट्र राज्य खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर मा.अ. अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील क्र.५३९६, ५३६१, ५३७६ व ५३७७/२०२१ प्रकरणामध्ये पारित झालेल्या आदेशानुसार,<br>१. उपसंचालक आरोग्य सेवा विभागाने केलेल्या सर्व पत्रव्यवहाराच्या प्रतीची साक्षांकित प्रत देण्यात यावी,<br>२. या आदेशानुसार झालेली चौकशी कार्यवाही व घेण्यात आलेल्या अंतिम निर्णयाची प्रत देण्यात यावी,<br>३. जिल्हा सामान्य रुग्णालय जालना यांनी या प्रकरण आदेशानुसार आपल्या विभागाकडे सादर केलेल्या सर्व खुलासा पत्राची साक्षांकित प्रत देण्यात यावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.३१.१०.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे. तथापि संबंधित जन माहिती

अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी उपलब्ध करुन देतील, ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिश: पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, उपसंचालक आरोग्य सेवा, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी, उपसंचालक आरोग्य सेवा, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत कार्यवाही केलेली नसून माहितीचा अर्ज योग्य पध्दतीने हाताळलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह दि.०७.०४.२०२६ रोजी वेळ दुपारी ०२.०० वा. आयोगासमोर व्यक्तिश: उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. उपसंचालक, आरोग्य सेवा, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 3172 दिनांक : 6/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

व्दितीय अपील क्रमांक ४६/२०२५
बोर्ड क्र.८२

श्री.एस.बि.सोनवणे,
रा.छत्रपती संभाजीनगर ई-मेल prahar007@gmail.com — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
शिरस्तेदार,
जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा अधीक्षक,
भूमि अभिलेख, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०२.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, श्री.ओमप्रकाश दिगांबर बुटे उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १४.०७.२०२४ | बनावट चलनाबाबत,<br>अ.आपल्या कार्यालयातील विभागातील उपविभागातील काही अधिकारी कर्मचारी यांनी बनावट चलनाव्दारे गेल्या ४-५ वर्षात जमीन मोजणी केली आहे त्याबाबत संबंधित दोषी अधिकारी कर्मचारी यांना ज्या नोटीसा दिलेल्या आहे त्यांच्या प्रती,<br>आ.बनावट चलनाव्दारे जमीन मोजणी करुन दिल्या प्रकरणी आपल्या कार्यालयातील संबंधित जबाबदार असलेल्या अधिकारी यांनी त्याबाबत संबंधित दोषी अधिकारी कर्मचारी यांच्या विरुध्द पोलीस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल केले आहे त्यांच्या एफआयआर च्या प्रती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्रयस्थ अधिकारी / कर्मचारी यांचेशी संबंधित असल्यामुळे सदर मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) मधील तरतुदीनुसार पुरविता येत नसल्याचे अपिलार्थीस दि.०२.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१४.०१.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेऊन अपिलार्थी यांचे प्रथम अपील अमान्य केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती

देण्यास टाळाटाळ, असे कारण नमूद केलेले आहे. आज सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रतिसाद देऊन माहिती / वस्तुस्थिती अपिलार्थीस अवगत केली असल्याचे दिसुन येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद आणि अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.०३.०९.२०२४ रोजीच्या प्रथम अपिलावर दि.१४.०१.२०२५ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3374 दिनांक : 11/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १८०४ ते १८०७/२०२५ (०४)

श्री.अनिलकुमार विजयकुमार गंगवाल,
रा.एन०९, ई-०२, प्लॉट नंबर २५, हडको, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्यालय सहायक,
उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपअधीक्षक,
भूमि अभिलेख, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०६.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये चार द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, श्री.एस.डी.इंगळे उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या चार जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ८३ | २४.०१.२०२५ | दि.०१.१०.२०२४ ते दि.२४.०१.२०२५ पर्यंत आवक व जावक नोंदवहीची छायांकित प्रत मिळणेबाबत, |
| ८४ | २४.०१.२०२५ | व्हर्जन २ हे २२ एप्रिल २०२४ पासुन लागु झाल्यापासुन ते २४ जानेवारी २०२५ पर्यंत उपअधीक्षक यांनी किती नकाशामध्ये आदेश पारित केले याची माहिती, |
| ८५ | २२.०१.२०२५ | प्रतिक रमेश डोंगरे हे दुरुस्ती लिपिक असुन त्यांना आतापर्यंत महिन्यानुसार किती मोजणी प्रकरण देण्यात आले, |
| ८६ | २२.०१.२०२५ | आपल्या कार्यालयात भूमापकाचे किती पदे आहेत व त्याचा दि.०१.०८.२०२४ ते दि.२२.०१.२०२५ पर्यंत नियोजन दौरा देण्यात यावा, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१९.०५.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, माहितीचे अवलोकन करणेकामी अपिलार्थीस कळविण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन माहितीचे अवलोकन करणेबाबत अपिलार्थीस सुचित करण्यात आलेले आहे. त्यानुसार अपिलार्थी यांनी माहितीचे अवलोकन करुन मागणी केलेली माहिती

अपिलार्थीस दि.२९.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांनी प्राप्त करुन घेऊन माहिती मिळाली अशी दि.३०.०५.२०२५ रोजी पोच दिलेली आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणाची आयोगासमोर सुनावणी आयोजित केल्याबाबतची आयोगाकडील सुनावणी नोटीस निर्गमित झाल्यानंतर अपिलार्थी यांनी दि.१९.०१.२०२६ रोजी जन माहिती अधिकारी यांना उद्देशुन लेखी निवेदन दिलेले आहे. या निवेदनामध्ये अपिलार्थी यांनी व्दितीय अपील क्र.१८०४, १८०५, १८०६ व १८०७/२०२५ मधील माहिती मिळाली असल्याचे, समाधान झाले असल्याचे व माहिती मिळाली असल्याकारणाने कोणतीही हरकत नसल्याचे नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे आयोगासमोर सादर केलेला युक्तिवाद व अपिलार्थी यांचे दि.१९.०१.२०२६ रोजीचे जन माहिती अधिकारी यांना उद्देशुन लिहिलेले लेखी निवेदन विचारात घेता, विचाराधिन चारही व्दितीय अपिले निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत:, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

उपरोक्त चार व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्रकाश

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 3373 दिनांक : 11/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २०४६/२०२५
बोर्ड क्र.८७

श्री.राजय किशनराव सदावर्ते,
रा. रो.हा.क्र.३३/१, व्दारकापुरी, एकनाथ नगर जवळ, उस्मानपुरा,
छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्यालय सहायक,
भूमि अभिलेख, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उप अधीक्षक,
भूमि अभिलेख, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२१.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, श्री.एस.डी.इंगळे उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १३.०१.२०२५ | सोबत जोडलेल्या एकुण २८२ मोजणी संचिकेच्या सत्यप्रती मिळणेबाबत, दि.२९.०८.२०१८ ते दि.०४.०७.२०२४, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती मोठ्या प्रमाणात असल्यामुळे दि.२२.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध अभिलेखाचे अवलोकन करणेबाबत अपिलार्थीस सुचित करण्यात आलेले आहे. तथापि अपिलार्थी अवलोकनास्तव उपस्थित न राहिल्यामुळे दि.१०.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध अभिलेखाचे अवलोकन करणेबाबत पुन:श्च संधी देण्यात येत असल्याबाबत अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे. तथापि अपिलार्थी अवलोकनास्तव उपस्थित राहिलेले नाहीत. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२५.०३.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, उपलब्ध माहिती अवलोकनार्थ उपलब्ध करुन देण्याचे निर्देशित केलेले आहे. सदर प्रथम अपील निर्णयानुसार दि.२५.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये दि.०३ व ०४.०४.२०२५ या तारखेस उपस्थित राहुन अवलोकन करुन आवश्यक माहिती कळविण्यात यावी, असे अपिलार्थीस सूचित करण्यात आलेले आहे. तथापि अपिलार्थीस सुचित केल्याप्रमाणे त्यांनी कार्यवाही केली नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध असुन आता आयोगाने निर्देशित

केल्याप्रमाणे अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने कार्यवाही करण्यात येईल.

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. जन माहिती अधिकारी यांनी माहितीचे अवलोकन करणेबाबत कळविण्याऐवजी उपलब्ध माहितीचे शुल्क कळविणे अपेक्षित होते. त्यांनी शुल्क कळविले असते तर त्याप्रमाणे शुल्काचा भरणा करुन माहिती हस्तगत करणे संयुक्तिक ठरले असते. मात्र त्यांनी माहिती देण्यास टाळाटाळ व्हावी या हेतुने अवलोकन करण्याचे कळविलेले आहे. सदर माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची नितांत आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे, अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती प्राप्त नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीचे अवलोकन करणेबाबत सुचित केले असल्याचे दिसुन येत आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, उप अधीक्षक भूमि अभिलेख, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. उप अधीक्षक, भूमि अभिलेख, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3297 दिनांक : 6/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वयें दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४१२०/२०२५
बोर्ड क्र.८८

श्री.सुरज गोविंद ढोरमारे,
रा.मेंढा, ता.जि.धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
शिरस्तेदार,
उपसंचालक भूमि अभिलेख कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यालय अधीक्षक,
उपसंचालक भूमि अभिलेख कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

### (सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१५.०९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, श्री.महेंद्र सुधाकर गारजकर व प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यालय अधीक्षक, श्री.दिनेश शिरसाठ उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०५.०२.२०२५ | Documents related to Scheme The Bombay Prevention of Fragmentation and Consolidation of Holding Act 1947--- |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.२०.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, माहिती विस्तृत असल्यामुळे ती एकत्रित करण्यास काही कालावधी लागणार असल्यामुळे अशी माहिती वेळेत पुरविता येणे शक्य नसल्याचे अपिलार्थी यांना अवगत करण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१६.०६.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, अभिलेखातुन शोध घेऊन माहिती १५ दिवसात उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन; दि.२६.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, मागणी केलेली माहिती अढळ होत नसल्यामुळे कार्यालयात उपस्थित राहुन अभिलेखाचे स्वत: अवलोकन करुन माहिती

प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित करण्यात आलेले आहे. वास्तविक अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील अभिलेख अढळ होत नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येणे शक्य झालेले नाही. सदर माहितीचा आणखी कसोशीने शोध घेण्याकरिता काही कालावधी उपलब्ध करुन दिल्यास पुन:श्च शोध घेऊन माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१६.०६.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे शोध घेऊन माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहिती स्वरुप विचारात घेता, मागणी केलेली माहिती अपिलार्थीस अधिनियमातील कलम २ (J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, उपसंचालक भूमि अभिलेख कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. कार्यालय अधीक्षक, उपसंचालक भूमि अभिलेख, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3298 दिनांक : 6/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४९०६/२०२५
बोर्ड क्र.८९

श्री.अब्दुल मशहुद मुर्गीस मोहम्मंदी,
रा.ग्रामीण रुग्णालयाजवळ, शहर अजिंठा,
ता.सिल्लोड, ता.छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
शिरस्तेदार,
जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा अधीक्षक,
भूमि अभिलेख, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.३०.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाटीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, श्री.ओमप्रकाश दिगांबर कुरे उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १४.०७.२०२५ | आपल्या कार्यालयामार्फत तालुका छत्रपती संभाजीनगर फुलंब्री, सिल्लोड, सोयगाव, खुलताबाद, कन्नड, गंगापूर, वैजापूर व पैठण येथील प्रत्येक तालुका कार्यालयाने आपल्या मार्फत १. निलंबित, २. शिक्षा (दंड), ३. पदावंती, ४. विभागीय चौकशी, ५. निष्काषित इ. नुसारज्या अधिकारी व कर्मचारी विरुध्द दि.०१.०५.२०२४ ते दि.३०.०६.२०२५ पर्यंत झालेली कार्यालयीन कार्यवाहीची नमुन ०९ तालुकानिहाय प्रमाणित यादी व कागदपत्र, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्रयस्थ अधिकारी / कर्मचारी यांचेशी संबंधित असल्यामुळे सदर मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (ज) व (त्र) मधील तरतुदीनुसार पुरविता येत नसल्याचे अपिलार्थीस दि.२४.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०४.१०.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जनउपयोगी नसल्याचा निष्कर्ष काढुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील अमान्य केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती

अप्राप्त, असे कारण नमूद केलेले आहे. आज सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रतिसाद देऊन माहिती / वस्तुस्थिती अपिलार्थीस अवगत केली असल्याचे दिसुन येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद आणि अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.०४.०८.२०२५ रोजीच्या प्रथम अपिलावर दि.०४.१०.२०२५ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.--3299-- दिनांक :--6/3/2026--नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ३०३/२०२५
बोर्ड क्र.९०

श्री.शेख हमीद पिर मोहम्मद,
रा.न्यु एस.टी.कॉलनी, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
शिरस्तेदार,
नगर भूमापन अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
नगर भूमापन अधिकारी,
छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२१.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, श्री.एच.जी.शिंदे उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०१.०८.२०२४ | अ. अमो. फारुक अली मो.अली, रा.एस.टी.कॉलनी, औरंगाबाद या नावाने मोहल्ला हमालवाडी येथील मोजणीचे चलन क्र.२१५/११/३/२०१३ ची साक्षांकित प्रत देण्यात यावी, व इतर तीन मुद्यांवर माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस प्राप्त होण्याच्या दृष्टीकोनातुन कलम ५ (४) नुसार सहायक जन माहिती अधिकारी यांचे सहाय्य घेण्यात आलेले आहे. त्यानुसार संबंधित सहायक जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.०७.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील संचिकेची अभिलेखात पडताळणी केली असता सदर संचिका उपलब्ध झाली नसल्यामुळे माहिती पुरविता येत नाही, अशी वस्तुस्थिती सादर केलेली आहे. संबंधित सहायक जन माहिती अधिकारी यांनी सादर केलेली वस्तुस्थिती दि.०७.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस अवगत करण्यात आलेली आहे. वास्तविक अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील अभिलेख अढळ होत नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येणे शक्य झालेले नाही. सदर माहितीचा आणखी कसोशीने शोध

घेण्याकरिता काही कालावधी उपलब्ध करुन दिल्यास पुन:श्च शोध घेऊन माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती अद्याप दिली नसल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप विचारात घेता, अशी माहिती अपिलार्थीस अधिनियमातील कलम २ (J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, नगर भूमापन अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. नगर भूमापन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।।६

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3306 दिनांक : 6/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १५२२/२०२५
बोर्ड क्र.९१

श्री.नसीर शेख दादामियाँ शेख,
रा.संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
शिरस्तेदार,
नगर भूमापन अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
नगर भूमापन अधिकारी,
छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२१.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३). अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, श्री.हनुमंत गंगाधर शिंदे उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १५.०१.२०२५ | दि.०१.०१.२०२४ ते आज मितीपर्यंत, शेक सांडु पि.शे.दावूद व शेख बक्षू पि.शे.दावूद यांच्याकडुन सुभद्राबाई यांनी नोंदणीकृत खरेदीखत आधारे विकत घेतलेली मिळकत बाबत न.भु.क्र. १२३६१ मध्ये नोंद घेण्याकरिता नगर भूमापन कार्यालयात अर्ज केला होता, सदरील अर्जा आधारे आपल्या कार्यालयातर्फे नमुना नं.९ ची नोटीस ऑनलाईन ई-चावडीवर दर्शविण्यात आली होती, ज्या जा.क्र.१७२६/२०२४ व फेर क्र.३०८२८ दि.०१.०२.२०२४ असा असुन सदरील नमुना नं.०९ ची नोटीस कोणत्या कागदपत्र आधारे काढण्यात आली याची माहिती व इतर माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.०४.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, नियमानुसार रु.२०१/- इतक्या फीसचा भरणा करुन माहिती प्राप्त करुन घेण्याचे कळविण्यात आलेले आहे. तथापि अपिलार्थी यांना सूचित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांनी कार्यवाही केली नसल्यामुळे माहिती देता आलेली नाही. आज रोजी आयोगासमोरील सुनावणीच्या अनुषंगाने

अपिलार्थी यांनी मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता सोबत आणलेली आहे. सदर माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता आज रोजी सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार सदर माहिती अपिलार्थीस देण्यात आली. अपिलार्थी यांनी सदर माहिती आयोगासमक्ष स्विकारलेली आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3362 दिनांक : 11/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २३७२/२०२५
बोर्ड क्र.१२

श्री.संतोष कुंदनलाल जैस्वाल,
रा.फ्लॅट नंबर बी-४, साई विहार रेसिडेन्सी, खडकेश्वर,
छत्रपती संभाजीनगर
अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
शिरस्तेदार,
नगर भूमापन अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
: उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
नगर भूमापन अधिकारी,
छत्रपती संभाजीनगर
: उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१७.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, श्री.हनुमंत गंगाधर शिंदे उपस्थित आहेत. अपिलार्थी,व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २१.०१.२०२५ | नभूमाक्र.२६६० श्री साई विहार सोसायटी मधील फ्लॅट बी-४ क्षेत्रफळ बाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.०६.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, काही माहितीचे शुल्क भरणा करुन माहिती प्राप्त करुन घेण्याचे व उर्वरित माहिती विस्तृत असल्याने त्यासाठी कार्यालयात येऊन निरीक्षण करुन नियमानुसार माहिती प्राप्त करुन घेण्याबाबत अपिलार्थीस कळविण्यात आलेले आहे. तथापि अपिलार्थीस सुचित केल्याप्रमाणे त्यांनी कार्यवाही केली नसल्यामुळे माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देता आलेली नाही. आज रोजी आयोगासमोरील सुनावणीच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता सोबत आणलेली आहे. सदर माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही अनुसरण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, दखल घेतली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता सोबत आणलेली आहे. तथापि आज रोजी सुनावणीकरिता अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, नगर भूमापन अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. नगर भूमापन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3363 दिनांक : 11/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५३७०/२०२५
बोर्ड क्र.९३

श्री.मोहम्मद इरफान मोहम्मद सिद्दीकी,
रा.कबाडीपुरा, बुढीलेन, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
शिरस्तेदार,
नगर भूमापन अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
नगर भूमापन अधिकारी,
छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२४.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, श्री.हनुमंत जी. शिंदे उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २१.०८.२०२५ | अ. मोहल्ला कबाडीपुरा बुढीलेन छ.संभाजीनगर येथील सि.स.नं.३६०७ पिआर कार्डमधील फेर क्रमांक ३०९६ दि.२३.०२.२००७ हा फेर ज्या कागदपत्राच्या आधारे घेण्यात आलेला आहे त्या संपूर्ण कागदपत्राच्या साक्षांकित प्रती,<br>ब. मोहल्ला कबाडीपुरा बुढीलेन छ.संभाजीनगर येथील सि.स.नं.३६०७/३ पिआर कार्डमधील फेर क्र.५७६५ दि.१३.०५.२०११ व फेर फार क्र.२३९४७ दि.०५.०३.२०२३ हा फेर ज्या कागदपत्राआधारे घेण्यात आलेला आहे त्या संपूर्ण कागदपत्राच्या साक्षांकित प्रती देण्यात याव्यात, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२८.०८.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, नियमानुसार शुल्काचा भरणा करुन माहिती प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीस कळविण्यात आलेले आहे. तथापि अपिलार्थीस सुचित केल्याप्रमाणे त्यांनी कार्यवाही केली नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आलेली आहे. आज रोजी सुनावणीच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी माहिती

अर्जाव्दारे मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता सोबत आणलेली आहे. सदर माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यात आलेली नसल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार सदर माहिती अपिलार्थीस देण्यात आली. अपिलार्थी यांनी सदर माहिती आयोगासमक्ष स्विकारलेली आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3364 /- दिनांक : 11/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे
3364

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५४५९/२०२५
बोर्ड क्र.९४

श्री.गोपाल पदमाकर कुलकर्णी,
रा.प्लॉट नंबर १६२, अल्कानगरी, गारखेडा परिसर,
छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
शिरस्तेदार,
नगर भूमापन अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
नगर भूमापन अधिकारी,
छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२७.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, श्री.एच.जी.शिंदे उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०२.०९.२०२५ | मो.र.नंबर १२८२, अर्ज क्र.१४८४, दि.१८.१२.२०१९ सि.स.नं.१५७३६/१० च्या हद्द कायम अतितातडी अर्ज प्रकरणाच्या संचिकेची प्रत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थीस प्राप्त होण्याच्या दृष्टीकोनातून दि.१६.०९.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सहायक जन माहिती अधिकारी तथा शिस्तेदार व अभिलेखपाल यांचे कलम ५ (४) प्रमाणे सहाय्य घेण्यात आलेले आहे. या नंतर दि.१९.०९.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप विचारात घेऊन माहिती अवलोकनास्तव उपलब्ध करुन देण्यात येत असल्याबाबत अपिलार्थी यांना अवगत करण्यात आलेले आहे. या नंतर दि.२६.०९.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील संचिका कार्यालयात उपलब्ध झाली नसल्याचे अपिलार्थीस अवगत करण्यात आलेले आहे. वास्तविक अपिलार्थी यांनी माहिती अर्जात ज्या संचिकेचा उल्लेख केलेला आहे त्या क्रमांकाची संचिकाच कार्यालयात अस्तित्वात नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळणे, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन, संचिका उपलब्ध झाली नसल्याचे अपिलार्थीस कळविले असल्याचे दिसुन येत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी कळविलेल्या माहिती / वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 2970 दिनांक : 25/2/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५४७१/२०२५
बोर्ड क्र.९५

श्री.हरजीत सिंग तीरथ सिंग सहाणी,
रा.तारा पान सेंटर जवळ, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर
छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
शिरस्तेदार,
नगर भूमापन अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
नगर भूमापन अधिकारी,
छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२८.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, श्री.एच.जी.शिंदे उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १०.०९.२०२५ | जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद पत्र जा.क्र.२०२२/साशा/लोदि/कावि-७७५, दि.१८.११.२०२२ १६४३९ २१.११.२०२२ चौकशी / कार्यवाई बद्दल कागदपत्रसह माहिती द्यावे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.०६.१०.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, http://bhulekh.mahabhumi.gov.in या संकेतस्थळावर संपर्क करुन माहिती प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीस अवगत करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता अपिलार्थी अनुपस्थित आहेत. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. सदर प्रयोजन विचारात घेता जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती अपिलार्थी यांना प्राप्त झाली असल्याचे दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, नगर भूमापन अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. नगर भूमापन अधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3296 दिनांक : 6/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक ५३२२, ५३६६ व ५३६८२०२५ (०३)**

अॅड.मिलिंद दि.वाहुळे, — अपिलार्थी
जिल्हा वकील संघ, जिल्हा व सत्र न्यायालय, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहायक आयुक्त,
समाज कल्याण विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, खोकडपुरा, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
प्रादेशिक उपायुक्त,
समाज कल्याण विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, सामाजिक न्याय भवन, खोकडपुरा, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२१.११.२०२५ (०१) व दि.२४.११.२०२५ (०२) रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये तीन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, श्री.आर.एम.शिंदे उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या तीन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ९६ | २५.०८.२०२५ | भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वधार योजना संदर्भात सन २०१७ ते २१.०८.२०२५ पर्यंत सर्व शासन निर्णयाच्या साक्षांकित प्रती मिळणेबाबत, |
| ९७ | २५.०८.२०२५ | भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वधार योजनात आलेला निधी व शासनास परत केलेल्या निधीच्या साक्षांकित प्रती तसेच सन २०१७ ते २०२४ पर्यंत करण्यात आलेल्या शासकीय ऑडिटच्या साक्षांकित प्रती, |
| ९८ | २१.०८.२०२५ | भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वधार योजना सन २०१९-२०, २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२०२३ तसेच २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील आलेला निधी, पात्र विद्यार्थ्यांची संख्या व लाभार्थ्यास वितरित केलेला रक्कमेसहीत विद्यार्थ्यांची यादी मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडुन प्राप्त झालेली आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली

माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे. त्यामुळे माहिती अर्जातील मागणीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या तीनही प्रथम अपिलांवर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०८.१०.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, सात दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन अपिलार्थी यांनी त्यांच्या तीनही माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती दि.०१.१०.२०२५ रोजीच्या पत्रासोबत अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांनी दि.०७.११.२०२५ रोजी व्यक्तिश: स्विकारुन माहिती मिळाली अशी पोच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे. आज सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

<u>आदेश</u>

उपरोक्त तीन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3365 दिनांक : 17/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४९९०/२०२५
बोर्ड क्र.९९

श्री.राजु सदाशिव पिदुरकर, — अपिलार्थी
रा.गट नंबर १४३, प्लॉट नंबर ११/२, आयप्पा मंदिरामागे,
साईनगर, सातारा परिसर, बीड बायपास, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
गृहपाल,
शासकीय आदिवासी मुलांचे वसतीगृह, विभागीय स्तर क्षमता १००० चावडा कॉम्प्लेक्स, आयप्पा मंदिर कमानीजवळ,
छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
गृहप्रमुख,
शासकीय आदिवासी मुलांचे वसतीगृह, विभागीय स्तर क्षमता १००० चावडा कॉम्प्लेक्स, आयप्पा मंदिर कमानीजवळ,
छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०४.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १४.०८.२०२५ | सन २०१८-१९ व २०१९-२० मधील आपल्या कार्यालयाकडे थकीत २,५४,०००/- रकमेस कारणीभूत तत्कालीन गृहप्रमुख कावरे, गृहपाल देशमुख, गडमे, गोरे तथा भांडारपाल गजानन कव्हलेकर व पं.ओ.गजानन फुंडे यांच्यावर चौकशी समिती लावुन वरील रकमेवर व्याज, दंड व मानहानी वसुल करणेकरिता कायदेशीर आदेश करणेबाबत, वरील सर्व लोकसेवकावर आपल्याकडुन काय कारवाई केली त्याच्या प्रती .. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपेक्षित

कार्यवाही न झाल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.३०.१०.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, नियमानुसार माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.३०.१०.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, माहिती अधिकार कायदा माहिती मिळविण्यासाठी असुन चौकशी लावणे व दंड आकारण्याचे निर्णय देण्यासाठी हे कार्यालय सक्षम नाही, तसेच माहिती अर्जातील मागणीनुसार वरिष्ठ कार्यालयाकडुन चौकशी लावणे व दंड आकारण्याचे या प्रकरणी कोणतेही आदेश प्राप्त नाहीत, माहिती अर्जानुसार व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार माहिती पुरविण्यात येऊन माहिती अर्ज निकाली काढण्यात येत असल्याचे अपिलार्थीस कळविलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये काही कार्यवाहीची अपेक्षा असल्याचे दिसुन येत आहे. तथापि ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समाविष्ठ होत नाही. ही बाब विचारात घेता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.३०.१०.२०२५ रोजी दिलेल्या प्रतिसादामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3366 दिनांक : 11/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २३३०/२०२५
बोर्ड क्र.१००

श्री.कोंडिबा संभाजी कोल्हे,
रा.श्रीराम कॉलनी, सेलू, ता.सेलू, जि.परभणी — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
राजश्री शाहु कला व विज्ञान महाविद्यालय, वाळुज,
ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी,
राजश्री शाहु कला व विज्ञान महाविद्यालय, वाळुज,
ता.गंगापूर, जि.छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

### (सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१३.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २०.०२.२०२५ | आपल्या महाविद्यालयात अनुकंपा तत्वावरील नियुक्तीकरिता प्राप्त झालेल्या अर्जाची सविस्तर माहिती,<br>१. प्राप्त झालेल्या अर्जदाराचे नाव व पत्ता, अर्जदारांनी दाखल केलेल्या अर्जाची छायांकित प्रत,<br>२. सदर अर्जाचे आपल्या कार्यालयातील आवक क्रमांक व आवक रजिस्टरच्या छायांकित प्रतीसह,<br>३. सदरील प्रस्तावावर आपल्या कार्यालयाकडुन केलेल्या कार्यवाहीचा तपशिल छायांकित प्रतीसह,<br>४. अनुकंपा तत्वावरील आजपावेतो मा.सहसंचालक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, छत्रपती संभाजीनगर विभाग, जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांच्या कार्यालयात पाठविलेल्या प्रस्तावांची माहिती, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित आहे. अर्जदार यांनी मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित असल्यास अधिनियमातील कलम ७ (७) व कलम ११ (१) नुसार

संबंधित त्रयस्थपक्षास त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे, ही बाब नैसर्गिक न्याय व पारदर्शकेतच्या दृष्टीकोनातुन योग्य ठरते. या नंतर माहिती प्रगट करणे व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत असल्यास अशी माहिती प्रगट करणे आवश्यक आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीमध्ये कोणतेही जनहित दिसुन येत नाही. तसेच मागणी केलेली माहिती प्रगट केल्यास नेमके कोणते जनहित साध्य होऊ शकते याबाबत अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये काहीही नमूद केलेले नाही. सारांशाने अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) मधील व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्यामुळे अशी माहिती अपिलार्थी यांना देय होणार नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.3367 दिनांक : 11/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २२२१/२०२५
बोर्ड क्र.१०१

श्री.नजीर खान शेर खान, — अपिलार्थी
रा.प्लॉट नंबर ३७, फरहत नगर, जटवाडा रोड, हर्सुल,
छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
मिलिंद कॉलेज ऑफ आर्ट्स, छावणी, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
प्राचार्य,
मिलिंद कॉलेज ऑफ आर्ट्स, छावणी, छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०४.०६.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १२.०२.२०२५ | अशोक नारायण डांगे या विद्यार्थ्याने अनुसुचित जातीसाठी जीओआय स्कॉलरशीपची माहिती बाबत, सन १९९७-९८,<br>१. आपल्या महाविद्यालयात सन १९९७-९८ या वर्षामध्ये बी.ए. III rd year ला अशोक नारायण डांगे नामक विद्यार्थ्याने प्रवेश घेतला होता का,<br>२. अशोक नारायण डांगे यांने बी.ए. III rd year साठी अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्यांना लागु असलेली जीओआय स्कॉलरशीपचा फॉर्म भरला होता का, भरला असल्यास तो फ्री शीपचा होता की देखभाल भत्ता पण क्लेम केला होता,<br>३. अशोक नारायण डांगे या विद्यार्थ्याला एकुण किती रक्कम जीओआय स्कॉलरशीपची अदा करण्यात आली होती,<br>४. अशोक नारायण डांगे या विद्यार्थ्याने तो शासकीय सेवेत असल्याचे व त्याच्या नियोक्ताचे बी.ए. III rd year ला ॲडमिशनसाठी परवानगी पत्र सोबत दिले होते का, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यास ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, उत्तर मिळाले नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असुन ती त्रयस्थपक्षाशी संबंधित आहे. माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मधील माहिती या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीचा विचार केल्यास प्रश्नार्थक स्वरुपाच्या माहितीचा माहिती या शब्दाच्या व्याख्येत समावेश होत नाही. तसेच अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित असल्यास माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (७) व कलम ११ (१) नुसार त्रयस्थपक्षास त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे, ही बाब नैसर्गिक न्याय व पारदर्शकतेच्या दृष्टीकोनातुन योग्य ठरते. या नंतर माहिती प्रगट करणे व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत असल्यास अशी माहिती प्रगट करणे आवश्यक आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीमध्ये कोणतेही व्यापक जनहित दिसुन येत नाही. तसेच मागणी केलेली माहिती प्रगट केल्यास नेमके कोणते जनहित साध्य होऊ शकते, याबाबत अपिलार्थी यांना सुनावणीदरम्यान आयोगाने विचारणा केली असता, याबाबत अपिलार्थी आयोगास कोणतेही समर्थनीय कारण देऊ शकलेले नाहीत. सारांशाने अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) मधील व्यापक जनहिताच्या कसोटीवर देखील उतरत नसल्यामुळे ती अपिलार्थीस देय होणार नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3368 दिनांक : 11/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

व्दितीय अपील क्रमांक १२७८/२०२५
बोर्ड क्र.१०२

श्री.कपिल सिध्दार्थ गायकवाड,
रा.दिक्षाभूमि नगर, हर्सुल, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
प्रक्षेत्र व्यवस्थापक,
शासकीय पशुपैदास प्रक्षेत्र, जळगाव रोड, हर्सुल,
छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विभागीय व्यवस्थापक,
शासकीय गोठीत रेतमात्रा निर्मिती केंद्र, जळगाव रोड, हर्सुल,
छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२५.०३.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०७.१२.२०२४ | जानेवारी २०२३ पासुन मेडिसन खरेदी व वापर यांची माहिती, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, चुकीची माहिती, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना त्यासोबत त्यांचे दि.२५.०३.२०२५ रोजीचे लेखी निवेदन सादर केलेले आहे. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. तथापि उपलब्ध करुन दिलेली माहिती चुकीचे असल्याचे अपिलार्थी यांनी या निवेदनामध्ये नमूद केलेले आहे. अपिलाथी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत व मोघम स्वरुपाची असल्याचे दिसुन येत आहे. अशी माहिती

एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3369 दिनांक : 11/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १६२६/२०२५**
**बोर्ड क्र.१०३**

श्री.बाबुराव गोविंदराव खंडागळे,
रा.प्लॉट नंबर १४, सर्वे नंबर १६०, रामचंद्र नगर, हर्सुल परिसर,
छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक संचालक (अतां, व),
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, भडकल गेट,
छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
निरीक्षक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, भडकल गेट,
छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२४.०४.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक, श्रीमती वाय.बी.राठोड व प्रथम अपिलीय अधिकारी तथा निरीक्षक, श्री.पी.बी.खोकले उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १०.११.२०२४ | १. दि.२४.१०.२०२४ रोजीच्या प्रथम अपील सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी मांडलेल्या मुद्याच्या अनुषंगाने मुद्देनिहाय मला अवगत केलेल्या पत्रव्यवहाराच्या झेरॉक्स किंवा अवगत केले नसेल तर ज्या शासन निर्णयानुसार अवगत केले नसेल तो शासन निर्णय व इतर पाच मुद्यांवर माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी कार्यालयाकडे दरम्यानच्या कालावधीमध्ये जवळजवळ ४० माहितीचे अर्ज दाखल केलेले आहेत. अपिलार्थी यांच्या सर्व माहिती अर्जाच्या अनुषंगाने सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन उपलब्ध माहिती अपिलार्थीस प्रदान करण्यात आलेली आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलांवर वेळोवळी गुणवत्तेवर आधारित सुनावणी घेऊन वस्तुनिष्ठ स्वरुपाचे निर्णय पारित केलेले आहेत.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगास उद्देशुन लिहिलेले दि.२०.०१.२०२६

रोजीचे लेखी निवेदन आयोगासमोर आहे. या निवेदनामध्ये अपिलार्थी यांनी, विभागीय चौकशीची कार्यवाही पूर्ण झालेली असल्यामुळे सादर केलेल्या व्दितीय अपिलानुसार मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता नाही, असे नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केलेला युक्तिवाद व अपिलार्थी यांचे दि.२०.०१.२०२६ रोजीचे लेखी निवेदन विचारात घेता, विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.3370 दिनांक : 11/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २०२०/२०२५
बोर्ड क्र.१०४

श्री.प्रशांत शिवाजी कुऱ्हे,
रा.घर नंबर जे ६/२, जे-सेक्टर, मुकुंदवाडी, एन-०२, सिडको,
छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक आयुक्त (औषधे),
अन्न आणि औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, अन्न व औषध प्रशासन संकुल, २ रा मजला, गट क्र.१९, पैठण रोड, कांचनवाडी, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहआयुक्त (औषधे),
अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, अन्न व औषध प्रशासन संकुल, २ रा मजला, गट क्र.१९, पैठण रोड, कांचनवाडी, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.१९.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०६.०३.२०२५ | मे.अजंता फार्मा लि.चिकलठाणा कंपनीने दि.२४.११.२०१५ रोजी बीटा लॅक्टम सेक्शन सरेंडर केले त्याबाबत संपूर्ण माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जास मुदतीत योग्य प्रतिसाद दिला नसल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमातील तरतुदीनुसार योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या

माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप विचारात घेता, अशी माहिती अधिनियमातील कलम २ (J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त (औषध), अन्न आणि औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त (औषध), अन्न आणि औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार सुसंगत कार्यवाही केलेली नसून माहितीचा अर्ज योग्य पध्दतीने हाताळलेला नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.०७.०४.२०२६ रोजी वेळ दुपारी ०२.०० वा. आयोगासमोर व्यक्तिशः** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

३. सहआयुक्त (औषधे), अन्न आणि औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २।।३

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 3166 दिनांक : 6/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५५२८/२०२५
बोर्ड क्र.१०५

श्री.मोहम्मद सालेह बिन माजी,
रा.प्लॉट नंबर ०१, नाहेतनगर, बाबर कॉलनी, अल समद मस्जिद जवळ, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक आयुक्त (अन्न),
अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, पैठण रोड, कांचनवाडी, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सह आयुक्त (अन्न),
अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, अन्न व औषध प्रशासन संकुल, दुसरा मजला, गट क्र.१९, पैठण रोड, कांचनवाडी, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०३.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १०.१०.२०२५ | श्री.इस्लाम बीन अब्दुला बिन माजी यांचे दि.१२.१२.२०१८ रोजीचे नोंदणी प्रमाणपत्र सोबत जोडले आहे त्यानुसार श्री.इस्लाम बीन अब्दुला बिन माजी यांनी दि.१२.१२.२०१८ रोजी नोंदणी प्रमाणपत्र मिळण्याकरिता अर्ज सोबत जे जे पुरावे दाखल केले होते सर्व कागदपत्रांचे सत्यप्रत देण्यात यावी, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, दिशाभूल करणारी माहिती दिली, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.१४.१०.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ८ (१) (घ), ८ (१) (ड) नुसार व्यावसायिक आणि स्पर्धात्मक माहिती उघड झाल्यास नुकसान होऊ शकते, तसेच अशी माहिती विश्वासाश्रीत संबंधामुळे उपलब्ध झाली असेल अशी माहिती उघड करुन नये, अशी माहिती देण्यास अपवाद केलेला असल्याने

मागणी केलेली माहिती द्यावयाची झाल्यास हे कायद्याचे उल्लंघन ठरणारे ठरेल, सबब माहिती देणे उचित नाही, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२५.११.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसनु येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन, मागणी केलेली माहिती कलम ८ (१) (त्र) नुसार त्रयस्थपक्षाची वैयक्तिक माहिती असल्याचा निष्कर्ष काढुन प्रथम अपील फेटाळलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद आणि अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.२८.१०.२०२५ रोजीच्या प्रथम अपिलावर दि.२५.११.२०२५ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 3377 दिनांक : 11/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४५५४/२०२५
बोर्ड क्र.१०६

श्री.प्रदिप केशवराव व्यास,
रा.घर नंबर २६/१२९६, वरुडा रोड, वैष्णव नगर, धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक संचालक (पुरातत्व),
विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर, सोनेरी महल,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसर,
छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक (पुरातत्व),
विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर, सोनेरी महल,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसर,
छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२१.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ बृहन्मुंबई यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरचे व्दितीय अपील बृहन्मुंबई खंडपीठाकडुन या खंडपीठास दि.०६.१०.२०२५ रोजी प्राप्त झाले असुन सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०५.०२.२०२५ | तेर ता.जि.धाराशिव गट नं.६६० पै क्षेत्र ०.१०आर मधील तीर्थकुंड जतन व संवर्धन कामासाठी काढण्यात आलेले वर्क ऑर्डर पूर्ण तपशिल याबाबत चार मुद्यांवर माहिती, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.०४.०४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०७.०५.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला असल्याचे दिसुन येत आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, मुद्दा क्र.४ च्या संदर्भातील अपिलार्थीस उपलब्ध करुन दिलेली माहिती योग्य असल्याचा निष्कर्ष काढुन मुद्दा क्र.१ ची

माहिती उपलब्ध करुन देण्याचे, मुद्दा क्र.२ बाबत योग्य तो निर्णय घेण्याचे व मुद्दा क्र.३ बाबत पुढील कार्यवाही प्रस्तावित करण्याचे जन माहिती अधिकारी यांना निर्देशित केलेले आहे. मात्र सदर प्रथम अपील निर्णयाची अंमलबजावणी झाली असल्याचे दिसुन येत नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप विचारात घेता, अशी माहिती अपिलार्थीस अधिनियमातील कलम २ (J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक (पुरातत्व), विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. उपसंचालक (पुरातत्व), विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3378 दिनांक : 11/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४७४८ व ४७४९/२०२५ (०२)
बोर्ड क्र.१०७ व १०८

श्री.संतोष भास्करराव चव्हाण, — अपिलार्थी
रा.ए.एम.सी. ४/३९/७६, गल्ली नंबर ०६, प्लॉट नंबर ६५,
जयभवानी नगर, मुकुंदवाडी रेल्वेस्टेशन, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.१
सहायक प्राध्यापक (विद्युत),
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, स्टेशन रोड, उस्मानपुरा,
छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, स्टेशन रोड, उस्मानपुरा,
छत्रपती संभाजीनगर

(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.२४.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| १०७ | १५.०७.२०२५ | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय कर्मशाळा मार्फत तांत्रिक तपशिल व तांत्रिक तपासणीच्या प्रती देण्यात यावी, जानेवारी २०२३ पासुन,<br>१. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय कर्मशाळा विभाग यांनी तांत्रिक तपशिल तयार करुन दिलेल्या छायांकित प्रमाणित सत्यप्रती,<br>२. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय कर्मशाळा विभाग यांनी तांत्रिक तपशिलनुसार तांत्रिक तपासणी करुन दिलेल्या प्रती छायांकित प्रमाणित सत्यप्रती, |
| १८ | ०३.०६.२०२५ | सन २०२३ ते मे २०२५ या कालावधीमध्ये टेक्निकल स्पेसिफिकेशन माविमं यांना देण्यात आले बाबत, सन २०२३ ते मे २०२५ पर्यंत,<br>१.महिला आर्थिक विकास महामंडळ छत्रपती संभाजीनगर या कार्यालयाने आज पर्यंत आपल्याकडे टेक्निकल स्पेसिफिकेशन करिता अर्ज केला आहे व आपण त्यांना मान्यता दिली आहे याबाबतची माहिती देण्यात यावी व इतर तीन मुद्यांवर माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात आलेली आहे. आज रोजीच्या सुनावणीच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणातील माहिती अर्जाच्या संचिकेऐवजी दुसरी संचिका सोबत आणली असल्यामुळे अपिलार्थीच्या माहिती अर्जासंदर्भात कार्यवाही केल्याचा पुरावा आयोगाच्या पटलावर सादर करता येणे शक्य होत नाही. तथापि अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली नसल्यास सदर माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने पुन:श्च उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या दोनही प्रथम अपिलावर अनुक्रमे दि.२९.०९.२०२५ व दि.२०.०८.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जावर विहित मुदतीत कार्यवाही केली असल्याचा निष्कर्ष काढुन संबंधित सहायक जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याचे निर्देशित करुन दोनही प्रथम अपील निकाली काढलेले आहेत. अपिलार्थीस माहिती प्राप्त झाली नसल्यास आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देतील, ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिश: पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनमध्ये, हेतुपुरस्सर माहिती नाकारल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप विचारात घेता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थीस अधिनियमातील कलम २ (J) मधील तरतुदीनुसार अवलोकनास्तव उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहायक प्राध्यापक (विद्युत), शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी प्रति माहिती अर्ज चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना प्रति माहिती अर्ज ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3379 दिनांक :- 11/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४८७८ व ४८७९/२०२५ (०२)
बोर्ड क्र.११० व १११

श्री.अमोल युवराज सोनवणे,
रा.ताकडगाव रोड, गेवराई, ता.गेवराई, जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक संचालक,
प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, गृह विभाग, महाराष्ट्र शासन, निजाम बंगला परिसर, छावणी, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, गृह विभाग, महाराष्ट्र शासन, निजाम बंगला परिसर, छावणी, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.२८.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक, श्रीमती मिनाक्षी माधवराव तोडकर व प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, श्री.नरेंद्र रामचंद्र गोसावी उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ११० | २८.०८.२०२५ | पोलीस ठाणे तलवाडा ता.गेवराई, जि.बीड गुरनं १३५/२०२४ कलम ७, ७अ, १२ भ.प्र.अ. १९८८ मधील दि.२१.०४.२०२४ रोजीचा लाचमागणी पडताळणी यशस्वी सापळा कारवाई पंचनामाबाबत माहिती, |
| १११ | २८.०८.२०२५ | पोलीस ठाणे तलवाडा ता.गेवराई जि.बीड गुरनं१३५/२०२४ कलम ७, ७अ, १२ भ.प्र.अ. १९८८ मधील लाचमागणी पडताळणी कार्यवाहीमध्ये सापळापूर्व कारवाई व यशस्वी सापळा कारवाई पंचनामा याची व्हाईस रेकॉर्डिंग करुन खोटी व बनावट स्क्रिप्ट तयार केली आहे, तरी गुन्ह्यातील व्हाईस रेकॉर्डिंग व स्क्रिप्ट मधील काही वाक्य माझे आहेत किंवा नाही आपल्या तज्ञांमार्फत पडताळणी होऊन स्पष्ट अभिप्राय मिळणेस विनंती आहे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना

आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.१९.०९.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात उपलब्ध असलेली माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विश्लेषणाशी संबंधित असुन माहितीसंदर्भातील प्रकरण विश्लेषित झालेले नाही.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१६.१०.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध करुन दिलेली माहिती योग्य असल्याचा निष्कर्ष काढुन अपिलार्थी यांची दोनही प्रथम अपिले निकाली काढण्यात आलेली आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मागणी केलेले कागदपत्र न देता चुकीची माहिती पुरविली, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे आयोगाच्या पटलावरील कागदपत्राचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन माहिती / माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती व त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद आणि अधिनियमातील तरतुदी या सर्व बाबींचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.२८.०९.२०२५ रोजीच्या दोन प्रथम अपिलांवर दि.१६.१०.२०२५ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3386 दिनांक : 11/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ९१७/२०२५
बोर्ड क्र.११२

ॲड.शैलेश चंद्रकांत देशमुख,
रा.काळुंका माता मंदिराजवळ, गांधी चमन, जुना जालना, जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
सहा.संचालक (व अतां),
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, भडकल गेट जवळ, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
निरीक्षक,
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, भडकल गेट जवळ, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २०.०१.२०२६)**

अपिलार्थी यांनी दि.०३.०३.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा सहायक संचालक, श्रीमती वाय.बी.राठोड व प्रथम अपिलीय अधिकारी तथा निरीक्षक, श्री.पी.बी.खोकले उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २६.०८.२०२४ | मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल O.A. No.५३५/१९९७ अरुण नरहरराव अंबेकर व इतर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर या प्रकरणी महाराष्ट्र शासनाचे अधिकारी मा.सुदाम विनायक राटोड सहा.संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद यांनी तसेच इतर अधिकारी यांनी शासनाच्या वतीने मा.न्यायाधिकरण येथे शासनाची बाजु / म्हणणे शपथपत्राव्दारे वेळोवेळी दाखल केले होते या अनुषंगाने चार मुद्यांवर माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांचा दि.२६.०८.२०२४ रोजीचा माहिती अर्ज कार्यालयास दि.२९.०८.२०२४ रोजी प्राप्त झालेला आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२७.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माहितीपोटीच्या रु.८४/- इतक्या विहित शुल्काचा भरणा करणेबाबत अपिलार्थी यांना सुचित करण्यात आलेले आहे. या नंतर दि.१५.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांनी मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली

आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२८.११.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद विचारात घेऊन अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि अपिलार्थीस पूर्वी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीशिवाय दुसरी कोणतीही माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे प्रथम अपिलाच्या निर्णयानुसार दि.०९.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सविस्तर वस्तुस्थिती अपिलार्थीस अवगत करण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जी माहिती कार्यालयात उपलब्ध आहे व जी माहिती कलम २ (च) नुसार उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे ती सर्व माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली असल्यामुळे विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२८.११.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, प्रथम अपील निर्णयानुसार माहिती उपलब्ध नाही असे कळविले, असे कारण नमूद केलेले आहे. आज सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती / माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहिती / वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 3384 दिनांक : 11/3/2026 नोंदणीकृत टपालाव्दारे